RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी
# शिव वाणी
बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २२ वे | अंक ०६ | सोमवार दि.१० फेब्रुवारी २०२५ | Mo.9422748792/ 9822628521 | पाने : ४ | किंमत ०३ ₹
Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-22 | Issue -06 | MONDAY DT.10 FEBRUARY 2025 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 3 RUPEES

## पैशासाठी खासदार बजरंग सोनवणे यांच्या येडेश्वरी कारखान्याने २ मुकादमांचे केले अपहरण

### मुकादमाच्या मुलीने पोलीस ठाण्यात तक्रार करतात नाट्यमयरीत्या अवघ्या २ तासात सोडले !

**प्रतिनिधी | बीड**

बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांचा केज तालुक्यात येडेश्वरी साखर कारखाना आहे. या कारखान्याची उचल घेऊन चार वाहने आणि ऊस तोडीसाठी टोळी लावणारे मुकादम सदाशिव तात्याराम चव्हाण आणि किसन भानुदास सुर्वे या दोघांना कारखान्याच्या अधिकाऱ्यांनी गोड बोलून ७ फेब्रुवारी रोजी घरातून अपहरण केले. संबंधित अधिकाऱ्यांना घरच्यांनी संपर्क करण्यास सुरुवात केल्यावर उडवा उडवीचे उत्तरे देण्यास सुरुवात केली. आपल्या वडिलांसह मामाचा जीव धोक्यात आहे म्हणून मुलीने ९ फेब्रुवारी रोजी २ दिवस




वाट पाहून थेट बीड ग्रामीण पोलीस स्टेशन गाठत लेखी तक्रार केली.सदरील घटनेची माहिती पोलीस अधीक्षकांना मिळताच पोलिसांनी फासे आवळले. यानंतर अवघ्या दोन तासांमध्ये कारखान्याचे अधिकारी आणि खासदारांचे स्वीय सहाय्यक पोलीस ठाण्यात दाखल झाले आणि अपहरण केलेल्या दोन्ही मुकादमांना नाट्यमरित्या सोडण्यात आले.

या घटनेने मात्र खळबळ उडाली असून खासदारांचा नवा चेहरा या निमित्ताने पुन्हा एकदा पुढे आला आहे.

बीड तालुक्यातील जिरेवाडी येथील शितल सदाशिव चव्हाण या २० वर्षीय मुलीने बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीमध्ये म्हटले आहे की, माझे वडील सदाशिव तात्याराम चव्हाण आणि मामा किसन भानुदास सुर्वे हे खासदार बजरंग सोनवणे यांच्या येडेश्वरी साखर कारखान्यांचे मुकादम म्हणून काम करतात. त्यांनी कारखान्याकडून पैशांची उचल घेतली आणि सदरील घेतलेले पैसे खाली टोळीला आणि पुढे वाहनांसाठी आगावू रक्कम उचल म्हणून दिलेले आहेत. कारखाना अजून एक महिना

(उर्वरीत पान २ वर)



दि. 09/02/2025

प्रति,
मा. पोलीस अधिक्षक साहेब,
बीड ग्रामीण पोलीस स्टेशन
ता. जि. बीड.

विषय : माझ्या वडिलांना दि. 07/02/2025 रोजी दुपारी महालक्ष्मी चौक, जिरेवाडी येथे बोलावून त्यांचे अपहरण केल्याबाबत, त्यांचा शोध घेऊन अपकृत्य करणाऱ्याविरोधात तात्काळ कार्यवाही करणेबाबत.

महोदय, वरिल विषयी संविनय तक्रार करते की, माझे नाव शितल सदाशिव चव्हाण असून माझे वडिल सदाशिव सातेराम चव्हाण हे ऊसतोड मुकादम आहेत. आम्ही दि. 07/02/2025 रोजी दुपारपासून त्यांच्या मोबाईलवर फोन करत आहोत. पण अदयाप फोन लागलेला नाही. पण त्याच रात्री ८ वाजता होंबरे नावाच्या गटप्रमुखाने सांगितले की, तुमच्या वडिलांना कारखान्यातील काही अधिकाऱ्यांनी नेलं आहे, त्यांची मोटारसायकल महालक्ष्मी चौकात आहे असं सांगून फोन कट केला.

येडेश्वरी शुगर्सचे गटप्रमुख व त्यांचे महेंद्र पाटील हे शेतकी अधिकारी व काही अज्ञात साथीदार कारणीभूत आहे. त्यांनी बेकायदेशीर आणि बळजबरीने त्यांचे अपहरण केले आहे. माझ्या वडिलांचा घातपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. माझ्या वडिलांना आणि माझ्या कुटुंबाला त्रास देणाऱ्या या लोकांवर कठोर कारवाई करण्यात यावी ही विनंती

अधिकाऱ्यांचे नाव : महेंद्र पाटील : 9552415941
(येडेश्वरी शुगर्स) होंबरे : 7058539935
शेळके :

शितल चव्हाण या मुलीने बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात दिलेली तक्रार

## ना. पंकजाताई मुंडेंच्या आदेशानंतर अधिकाऱ्यांनी केली परळीच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेची पाहणी



### परळीच्या मेरूगिरी डोंगरासह, लोणी, लोणारवाडी येथील जागांना दिल्या भेटी

**प्रतिनिधी | परळी**

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या आदेशानंतर पशुवैद्यकीय विज्ञान विद्यापीठाच्या तसेच महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आज परळीत होत असलेल्या प्रस्तावित पशुवैद्यकीय महाविद्यालयांसाठी विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेटून जागेची पाहणी केली.

पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी परळीत पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याकरिता विभागाला नुकतेच आदेशित केले होते. महाविद्यालय स्थापन करण्याकरिता मुलभूत सोयीसुविधांचे निरीक्षण व भारतीय पशू चिकित्सा परिषद नवी दिल्ली यांचे मानकानुसार आवश्यक असलेल्या बाबींच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरिय निरीक्षण समिती गठीत करण्यात आली असून या समितीचे अध्यक्ष तथा पशू विज्ञान विद्यापीठाचे डीन डॉ. एस व्ही. उपाध्ये, डॉ. जी. एस. खांडेकर, कनिष्ठ अभियंता डॉ. पी.व्ही. तायडे, आरिफ शेख, तांत्रिक अधिकारी डॉ पी. इ. ताकसांडे यांच्यासह परळीचे उप जिल्हाधिकारी अरविंद लाठकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, पशुसंवर्धन सहायक आयुक्त डॉ. विजय कराड, उपायुक्त डॉ. आर डी कदम आदींनी आज तालुक्यातील लोणी, लोणारवाडी या गावांसह परळी शहरातील वैद्यनाथ मंदिराच्या परिसरात असलेल्या मेरूगिरी डोंगरावरील जागेची पाहणी केली.

महाविद्यालयांसाठी लागणारी जमीन लोणी येथे १२ हेक्टर, लोणारवाडी येथे १८ हेक्टर आणि परळी शहराच्या मेरूगिरी डोंगरावर सुमारे २० हेक्टर जमीन उपलब्ध आहे, या सर्व ठिकाणी मुलभूत सोयी सुविधा देखील सहज उपलब्ध होऊ शकतील का? याचा देखील आढावा अधिकाऱ्यांनी घेतला. जागेच्या पाहणीचा अहवाल ना. पंकजाताई मुंडे यांना सादर केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

## शिंदे - जगतापचा शाही थाटात विवाह सोहळा संपन्न



**प्रतिनिधी | नेकनुर**

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना.धनंजय मुंडे व खा.बजरंग बाप्पा सोनवणे यांचे जिवलग मित्र मा.जि.सदस्य नारायण बाप्पा शिंदे यांचे सुपुत्र चि.ओमकार आणि बीड जिल्ह्यातील नामांकित उद्योजक आप्पासाहेब जगताप यांची कन्या डॉ सानिया यांचा शाही विवाह सोहळा शुक्रवारी बीड येथील आशिर्वाद लॉन्स येथे न भूतो न भविष्यती असा उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा भव्य दिव्य नियोजनात संपन्न झाला.

यावेळी ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे, नाना महाराज कदम, मौलाना सय्यद साबेर अली,जेष्ठ नेते माजी मंत्री शिवाजीराव पंडित,खा.बजरंग बाप्पा सोनवणे,आ.सुरेश धस, आ.संदीप भैय्या क्षीरसागर , माजी आ.आणासाहेब माने माजी

(उर्वरीत पान २ वर)

## व्हॉईस ऑफ मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी जालिंदर धांडे



**प्रतिनिधी | बीड**

व्हॉईस ऑफ मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी दैनिक प्रारंभचे संपादक जालिंदर धांडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. रविवारी दुपारी या संदर्भात बीड येथे एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांची ऑनलाईन उपस्थिती होती.

व्हॉईस ऑफ मीडिया ही संघटना पत्रकारांच्या प्रश्नावर गेल्या पाच वर्षांपासून देशभरात काम करते. मागील तीन

(उर्वरीत पान २ वर)

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईची गेवराई तालुका कार्यकारणी जाहीर

### गेवराई तालुकाध्यक्षपदी अंकुश आतकरे तर शहराध्यक्षपदी कैलास हादगुले








**प्रतिनिधी | गेवराई**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईची गेवराई तालुका कार्यकारणीची बिनविरोध निवड करण्यात आली. सर्वानुमते गेवराई तालुका अध्यक्षपदी मागील नऊ वर्षापासून सातत्याने अध्यक्ष म्हणून उत्कृष्ट कार्य करणारे अंकुश आतकरे यांची पुन्हा एकदा तालुका अध्यक्षपदी फेर निवड करण्यात आली. त्याचबरोबर शहराध्यक्षपदी कैलास हादगुले तर गेवराई तालुका सचिवपदी तुळशीराम वाघमारे यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित सर्व कार्यकारिणीचे नियुक्तीपत्र,शाल, पुष्पगुच्छ देऊन प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी पत्रकार संघाच्या वतीने पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे साहेब यांच्या सूचनेवरून पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या आदेशानुसार गेवराई तालुका कार्यकारणी निश्चित करण्यासाठी प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली गेवराई येथील शासकीय विश्रामगृह येथे रविवार दि. ९ फेब्रुवारी रोजी पत्रकार संघाची तालुकास्तरीय बैठक संपन्न झाली. सर्वप्रथम दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून बैठकीची सुरुवात झाली. या बैठकीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे विभागीय उपाध्यक्ष सुनील पोपळे, डिजिटल मीडियाचे बीड जिल्हा अध्यक्ष अनिल आगुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्वानुमते खेळीमेळीच्या आनंदी वातावरणात

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीला आ.संदीप क्षीरसागर आले धावून!

### हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी तत्काळ मुदतवाढ द्यावी

**प्रतिनिधी | बीड**

बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ऐनवेळी आ.संदीप क्षीरसागर धावून आले आहेत. मतदारसंघासह जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीनच्या खरेदीसाठी नाफेडकडे नावनोंदणी केली, मात्र मुदत संपल्यानंतर आता ही खरेदी कधी होणार? असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत असून शासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करत हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी तत्काळ मुदतवाढी द्यावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पणण मंत्री जयकुमार रावल व राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे केली आहे. याबाबत लेखी पत्रही आ.क्षीरसागर यांनी दिले आहे.



सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर अन् त्यांच्या संवादातून लक्षात आलेल्या समस्या लक्षात घेवून आ.संदीप क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांच्या भावना पत्र लिहून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यापर्यंत पोहचवल्या आहेत. हंगाम २०२४-२५ मधील हमीभावाने सोयाबीन खरेदीला मुदतवाढ दिल्यास सर्व शेतकऱ्यांकडील सोयाबीन खरेदी होवू शकते याकडे लक्ष वेधत आ.संदीप क्षीरसागर यांनी याबाबतच्या पत्रात नमूद केले आहे की, केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या संदर्भीय धोरणानुसार सुरूवातीला दि.३१ जानेवारी २०२५ पर्यंत त्यानंतर दि.६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सोयाबीन खरेदीच्या बाबतीत मुदतवाढ देण्यात आली होती; परंतु बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील नोंदणीधारक शेतकरी ४४ हजार ७०० च्या वर आहेत. त्यापैकी दि.६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत किमान

(उर्वरीत पान २ वर)



# संपादकीय

## कुरघोड्या आणि अदृश्य हात

रायगड व नाशिक जिल्ह्यांची पालकमंत्रिपदे रद्द करण्यात आली. शिंदे नाराजी दर्शविण्यासाठी अनेक शासकीय बैठकांना अनुपस्थिती दर्शवू लागले. मात्र, या सगळ्या घटनांबाबत भाजपकडून फारशी प्रतिक्रिया आली नाही. या पार्श्वभूमीवर बुधवारी भाजपने ज्या जिल्ह्यांमध्ये त्यांचे पालकमंत्री नाहीत तिथे संपर्कमंत्री म्हणून पक्षीय नियुक्त्या जाहीर केल्या.

भारतीय जनता पक्षाकडे निवडणूक जिंकण्याची अजस्र व चोख यंत्रणा असल्याचे अनेक राजकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे. विरोधकांचे याबाबत कायम मतभेद असतात. भाजपने प्रशासकीय यंत्रणा आपल्या खिशात घातल्या असून त्याद्वारेच त्यांना निवडणुकीतील यश प्राप्त होते, असा आरोप सातत्याने त्यांच्या विरोधात केला जातो.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये काही तरी गडबड केली जाते, इथपासून ते मतदार याद्यांमधील गोंधळापर्यंत सगळ्या बाबींवर विरोधक हे सामान्य जन संभ्रमित होतील, अशा प्रकारची वक्तव्ये सातत्याने करत राहतात. मात्र, निवडणुकीपूर्वीच्या पाच वर्षांत भाजप काय करतो, याबाबत फारसे कुणी अभ्यास करताना दिसत नाही. महाराष्ट्रात भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीने महाप्रचंड यश मिळवले. त्या जागी बोलघेवड्या विरोधी पक्षांपैकी कुणीही असता तर सत्तेची गोमटी फळे चाखत सुशेगात असता. भाजप मात्र पहिल्या दिवसापासून पुढील निवडणुकीच्या तयारीला लागला आहे. भाजपला १३२ व महायुतीला २३७ जागा मिळाल्यावर सत्तेची पाच वर्षे ही मजा व माज करण्यासाठीच आहेत, असे भाजप वगळता इतर सगळ्याच पक्षांच्या नेतृत्वाला वाटले असते, मात्र आजही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे ५७ व अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडे असलेल्या ४१ जागा या भविष्यात शतप्रतिशत सत्तेसाठी अडसर आहेत, हे भाजपच्या चाणाक्ष राजकीय नेतृत्वाला वेगळे सांगण्याची गरज नाही. त्यामुळेच जनतेचे इतके अवाढव्य पाठबळ मिळूनही व काडीचेही नैतिक बळ नसलेल्या विरोधकांची पार दैना उडालेली असतानादेखील सरकारमध्ये सारे काही आलबेल चालताना दिसत नाही.

सरकार बसते न बसते तोच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण ऐरणीवर आले. त्यात राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधातील आरोप अद्याप थांबलेले नाहीत. यात धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा, असे खरे तर मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस सांगू शकले असते. मात्र, त्याबाबत न बोलण्याचे राजकीय शहाणपण त्यांनी दाखवले. त्यातून दररोज क्षणागणिक राष्ट्रवादीची 'टग्यांचा पक्ष' ही प्रतिमा ठाशीव होऊ लागली आहे. दुसरीकडे अडीच वर्षे मुख्यमंत्रिपद भूषवलेले व भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाचा आशीर्वाद लाभलेले माजी मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्रिपद हातचे गेल्याने राजकीय पटलावरून जणू अदृश्य झाले आहेत. त्यातच परिवहन खात्याने एसटीकरिता खरेदी करायच्या गाड्यांबाबत घोटाळा झाल्याच्या इशारेवजा बातम्याही पेरल्या गेल्या. हे होते न होते तोच पालकमंत्रिपदावरून शिंदे यांचे काही शिलेदार चिडले. यातून शिंदेंची शिवसेना व अजित पवारांची राष्ट्रवादी यात जोरदार धुसफूस सुरू झाली.

# गेवराईच्या द बा घुमरे पब्लिक स्कूलमध्ये स्नेहसंमेलन व मातापालक मेळावा संपन्न

प्रतिनिधी । गेवराई

शैक्षणिक सामाजिक , सांस्कृतिक व शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या कै.वंचळाबाई घुमरे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित द.बा घुमरे पब्लिक स्कूल गेवराई येथे वार्षिक स्नेहसंमेलन व माता पालक मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला.

राजमाता जिजाऊ माँसाहेब, सरस्वती आणि संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. द.बा घुमरे (तात्या) यांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव दीपक घुमरे तर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती भाऊसाहेब नाटकर, डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. उद्धवराव घोडके, संपादक शिवाजीराव ढाकणे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते दगडू चव्हाण, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक थेटे सी एल, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक घुमरे एस के यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वेदांत तौर, येवले तनुष्का, शेख हिबाअनम , पवार जिज्ञासा, घुमरे आर्या, फलके मुक्ता या विद्यार्थ्यांनी तर श्रीमती सुप्रिया मोरे यांनी पालक प्रतिनिधी म्हणून शाळा आणि येथील शिक्षकांबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांनी केलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील कामगिरीबद्दल त्यांचा गुण गौरव बक्षीस वितरणाच्या माध्यमातून करण्यात आला. यामध्ये जी टी एस परीक्षेतील विद्यार्थी, एन एम एम एस परीक्षेमधील विद्यार्थी, स्कॉलरशिप परीक्षेतील विद्यार्थी, गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षेतील विद्यार्थी, होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेतील विद्यार्थी, डॉक्टर हेडगेवार जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेतील विद्यार्थी, नॅशनल लेवल सायन्स, मॅथ, इंग्लिश,ओलंपियाड स्पर्धेतील विद्यार्थी, गेवराई येथील संपन्न झालेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनातील विद्यार्थी तसेच शालेय स्तरावर आयोजित विविध स्पर्धेतील विद्यार्थी यांचा ट्रॉफी




व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित केलेल्या स्नेहसंमेलनामध्ये कोळीगीत, शेतकरी गीत, देशभक्ती गीत, विनोदी नाटके असे वेगवेगळे कलाविष्कार सादर करून प्रेक्षकांचे मन जिंकले.

या कार्यक्रमाला विद्यार्थी,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच माता पालक वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे ए जे, श्रीमती चौधरी मॅडम, श्रीमती कुलकर्णी मॅडम, श्रीमती काळे मॅडम व श्रीमती पूजा मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री शिंदे ए जे यांनी केले.

# आपल्यातील न्युनगंडाला सामर्थ्यात बदलण्याचे सामर्थ्य तरुणात असले पाहिजे - अंकुर तांगडे

प्रतिनिधी । बीड

मी मराठवाड्यातील आहे. मी बीडचा आहे.मी दुष्काळी भागातील आहे. माझी भाषा ही प्रमाण भाषा नाही.मी महीला आहे. मी शेतकर्याचा मुलगा आहे. या सर्व बाबीं विषयी न्युनगंड घेऊन आपण जगत असतो. पण याच बाबींचे सामर्थ्य बनवून आपण आपले करीअर घडवू शकतो हे आपण विसरतो. लोकांनी आपल्याला ज्या गोष्टींमुळे हीन लेखलेले असते. त्याच बाबी आपले सामर्थ्य आहे हे आपण ओळखले पाहिजे आणि पुढे गेले पाहिजे असे मत दि. ७ फेब्रूवारी २०२५ रोजी बंकट स्वामी महाविद्यालय बीड येथे स्नेहसंमेलना निमित्त आयोजित तरुणोत्सवात अंकुर तांगडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले.पुढे बोलताना अंकुर तांगडे म्हणाले की,न्युनगंडाला सामर्थ्यात बदलण्याची ताकद तरुणाईत असली पाहिजे माझा स्टेजवरचा परफार्मन्स बघून मला पुण्या मुंबईमधील लोक सहज म्हणतात, तु बीडची वाटत नाहीस. आपण बीडचे वाटत नाही ही माझी तारीफ नाही तोहीन आहे असं मी समजते. आपण बीडचे आहोत तर बीडचे वाटलो पाहीजे.आपणाला बीडकर म्हणूनच ओळखलं पाहिजे. अशा माणसाला मी आपल्या बीडच्या ढंगात म्हणते, आता माय मग कुठली वाटतेय ,मी बीडचीच हाय ना मी असं म्हटल्यावर लोक खळाळून हसतात. लोकांच्या चेहर्यावर हसु फुलवण्याचे काम आपणाला करता आलं पाहिजे. आपली भाषा हे आपले सामर्थ्य आहे. या भाषेच्या जोरावर खुप लोक फिल्म ईन्डस्ट्री मध्ये टीकून आहेत. असे मार्गदर्शन करता करता. त्यांनी स्टॅण्डप कॉमेडी




करून त्याचे प्रात्याक्षीत मुलांसमोर सादर केले. मुलांनी खळाळून या कॉमेडी शो ला दाद दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ शिवाजी मोरे यांनी केले, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य विवेक मिरगे यांनी भुषविले. कार्यक्रमाचे संचालन डॉ प्रकाश कोंका व डॉ दीपमाला माने यांनी केले. कार्यक्रमाला डॉ शंकर धांडे, प्रा डॉ महादेव जगताप, डॉ राजिव काळे, प्रा छाया सोंडगे, प्रा नितीन चव्हाण, प्रा. ब्रम्हनाथ मेंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रसिद्ध स्टॅण्डप कॉमेडीयन अंकुर तांगडे यांच्या हस्ते शैक्षणिक, क्रिडा, कला, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.




# महाराणी ताराबाई विद्यालयात इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

प्रतिनिधी । वडवणी

महाराणी ताराबाई विद्यालयातील इयत्ता १० वी व १२ वी विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना एपीआय अमन सिरसट म्हणाले की,विद्यार्थी मित्रांनो आज मेहनत केली तर उद्याचे तुमचे भविष्य उज्वल आहे म्हणून आज अभ्यास करा.आयीस्ता चल जिंदगी अबी कही कर्ज चुका ना बाकी है। कुछ दर्द मिटाने बाकी है।कुछ फर्ज निभाना बाकी है। या कवितेच्या ओळीचा अर्थ आपण लक्षात घेतला तर माझ्या भाषणाचा सार्थक झालं असे समजेल तसेच बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी क्यूआर कोड बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये सुरू केलेला आहे त्याबद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता-१० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शनिवार दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्यालयांमध्ये संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी.डी.तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून वडवणी पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी एपीआय अमन सिरसट तर प्रमुख अतिथी म्हणून बलभीम महाविद्यालय बीड येथील उपप्राचार्य बिराजदार सर,प्रा.तुपे सर,कवडगाव येथील जय जवान विद्यालयाचे प्राचार्य सारोक्ते डी.जी. सर,वडवणी पोलीस स्टेशन येथील राऊत सर तसेच मुंजाळ सर,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्री.डोईफोडे सर,श्री.ठोंबरे सर,श्री.कुलकर्णी सर,श्री.चोले सर आदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करू कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

विद्यालयातील विद्यार्थी चि.समाधान मुंडे,कु.राधिका निरडे,कु.प्रिती तुरुकझाडे यांनी आपल्या मनोगतातून शाळेतील आठवणींना उजाळा दिला तसेच मान्यवरांनी व अध्यक्ष प्राचार्य राऊत सर यांनी परीक्षार्थी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

# नागसेन बुद्ध विहार बीड येथे माता रमाई यांची १२७ वी जयंती हर्ष उल्हासात साजरी

## माता रमाई यांच्या जयंतीदिनी प्रो.डॉ राणी जाधव यांचा सत्कार

प्रतिनिधी । बीड

लहानपणी शाळेतील वर्गाच्या बाहेर बसून शिक्षण घेणाऱ्या भिवाला जीवनसाथी म्हणून सुभेदार रामजीबाबांनी बापाविना पोरकी असलेल्या रमाईला सून म्हणून आपल्या घरी आणले. या माता रमाईने कोणत्याही प्रकारच्या सुखाची अपेक्षा न करता प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेबरुपी महासागरा बरोबर संसार करताना जीवनभर दुःखाच्या अनेक लाटा सहन केल्या. अतिउच्च शिक्षण घेतलेल्या डॉ.बाबासाहेबानी खोऱ्यानी पैसा ओढला असता परंतु अंधारात खितपत पडलेल्या दीनदलीत समाजाच्या, स्त्री पुरुषांच्या उद्धाराकरिता,व देशाच्या प्रगती करता जीवनभर कष्ट केले.आपल्या सुखी संसाराकडे,आपल्या आर्थिक परिस्थितीकडे त्यांनी लक्ष दिले नाही. औषध पाण्याशिवाय, वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे ४ लेकरांना गमवावे लागले त्या थोर त्याग मूर्ती रमाईचा आज २१ व्या शतकातील कोणत्याही स्त्री पुरुषांना विसर पडू नये असे भावपूर्ण उदगार माया दिवाण यांनी



काढले.

नागसेन बुद्ध विहार धानोरा रोड बीड येथे माता रमाई यांच्या १२७ व्या जयंती दिनी विनम्र अभिवादन कार्यक्रम प्रसंगी आयु. केशरताई कांबळे अध्यक्षपदी लाभल्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कवयित्री माया दिवाण उपस्थित होत्या,विचार मंचावर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय गढी येथील गृहविज्ञान विभाग प्रमुख प्रो.डॉ राणी जाधव यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते तथागतांच्या प्रतिमेस पुष्प व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्प माला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक से.नि जिल्ह प्रबंधक (एलआयसी) यु एस वाघमारे यांनी केले तर सूत्रसंचालन बौद्धाचार्य ज्ञानोबा पोटभरे यांनी केले. याप्रसंगी प्रो.डॉ राणी जाधव यांची पीएच.डी करित असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून निवड व प्रोफेसर पदी पदोन्नती झाल्याबद्दल नागसेन बुद्ध विहाराच्या वतीने यतोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी दान पारमिताचे पालन करून एडवोकेट राहुल मस्के यांनी आपल्या आईच्या पहिल्या स्मृतीदिनी बुद्ध आणि त्यांचा धम्म या अनमोल ग्रंथाच्या बारा प्रति वाचाल तर वाचाल या फिरते मोफत वाचायला बीड शहरातील विविध बुद्ध विहारांमध्ये वितरित करण्यासाठी दिल्या होत्या त्यापैकी दोन ग्रंथ वाचाल तर वाचाल या फिरते

पान १ वरून...

**पैशासाठी खासदार ...**

चालणार आहे. त्यांचे घेतलेले पैसे कामामध्ये पूर्णपणे फिटणार आहेत. असे असताना सुद्धा खासदार बजरंग सोनवणे यांच्या साखर कारखान्यातील गटप्रमुख अधिकारी ठोंबरे आणि शेतकी अधिकारी महेंद्र पाटील यांच्यासह इतर अज्ञात व्यक्तीने ७ फेब्रुवारी २०२५ रोजी जिरेवाडीतील चव्हाण यांच्या घरी येऊन या दोघांना गोड बोलत महालक्ष्मी चौकात नेले. त्या ठिकाणी माझ्या वडिलांची गाडी तिथेच सोडून या दोघांना बळजबरीने त्यांच्या गाडीत टाकून अपहरण केले. त्यांना महालक्ष्मी चौकातून पाथर्डी येथे नंतर मंजिरी फाटा येथे नेण्यात आले. त्यांचा मोबाईल या अधिकाऱ्यांनी काढून घेतला. त्यांना मारहाण करत कारखान्यामध्ये उपाशी डांबून ठेवले असल्याची माहिती मिळाली आम्ही संबंधित अधिकाऱ्यांना ७ तारखेपासून संपर्क करत होतो मात्र त्यांनी सुरुवातीला कोण सदाशिव चव्हाण ? आम्ही त्यांना ओळखत नाहीत ? असे म्हणत उडवा उडवीचे उत्तरे दिली. त्यामुळे आम्हाला त्यांच्या जीविताशी ते लोक काही बरे वाईट करतील का ? त्यांचा घातपात होईल का ? अशी चिंता वाटू लागली. नंतर त्याच अधिकाऱ्यांनी उचल घेतलेली रक्कम द्या अन्यथा तुमच्या वडिलांना सोडणार नाहीत अशी धमकी दिली. हा खासदार बजरंग सोनवणे आणि त्यांच्या कारखान्याकडून होत असलेला एक प्रकारे अन्याय आहे. त्यामुळेच बीड ग्रामीण पोलीस स्टेशनला रितसर तक्रार देत शितल चव्हाण या मुलीने न्याय मागितल्यानंतर पोलिसांनी आपली सूत्रे हलवताच खासदार बजरंग सोनवणे आणि त्यांच्या कारखान्यावरील अधिकाऱ्यांच्या पायाखालची वाळू सरकली. अवघ्या दोन तासात कारखान्याचे अधिकारी आणि खासदारांचे स्वीय सहाय्यक ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल झाले. आणि अपहरण केलेल्या दोन्ही मुकादमांना सोडून देण्यात आले. सदरील प्रकरण परस्पर मिटवण्याचा प्रयत्न होत असून याप्रकरणी संबंधित मुलीच्या तक्रारीवरून बीड ग्रामीण पोलीस स्टेशनला रितसर तक्रार दाखल करण्यात आली आहे. या घटनेने मात्र पुन्हा एकदा सामाजिक आणि राजकीय खळबळ उडाली आहे हे नक्की.

**सोयाबीन उत्पादक ...**

२१ हजार शेतकरी बांधवांककडून सोयाबीन खरेदी झालेली आहे.

बीड मतदार संघासह जिल्ह्यातील किमान ४० टक्क्याच्यावर शेतकरी बांधवांची खरेदी अजूनही शिल्लक आहे. त्यामुळेच या सर्व शेतकरी बांधवांच्या सोयाबीनची खरेदी करण्यासाठी मुदतवाढ द्यावी व त्यातून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी महत्वाची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. निवेदनातच्या प्रती राज्याचे मुख्य सचिव व अवर सचिवांनाही पाठवण्यात आल्या आहेत. आ.संदीप क्षीरसागर यांनी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न राज्य शासनापर्यंत पोहचवले आहेत. आता शासनाकडून मुदतवाढीचा निर्णय कधी होतो याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे.

**व्हॉईस ऑफ मीडियाच्या...**

वर्षांपासून बीड जिल्हाध्यक्ष म्हणून बालाजी मारगुडे यांनी काम पाहिले. नविन

पान १ वरून...

होतकरू पत्रकारांना जिल्हाध्यक्ष पदावर संधी मिळावी. पत्रकारांमध्ये सतत नविन नेतृत्व तयार व्हावे यासाठी मारगुडे यांनी जालिंदर धांडे यांचे नाव जिल्हाध्यक्षपदासाठी सुचविले होते. त्यास पत्रकार सोमनाथ खताळ, आनंद डोंगरे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर पत्रकार दिनेश लिंबेकर, सुनील यादव, अमोल मुळे, ज्ञानेश्वर वायबसे, केशव कदम, शुभम खाडे, डॉ.गणेश ढवळे, धनंजय जोगडे आदींनी धांडेंच्या नावाला सहमती दर्शविली. त्यानंतर व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी जालिंदर धांडे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड जाहीर केली. या निवडीबद्दल त्यांचे बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधवांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

**शिंदे – जगतापचा ...**

आ.सय्यद सलीम, मा.आ.राजेंद्र जगताप, मा.आ. जनार्दन तुपे, पुणे जिल्हा भाजपा उपाध्यक्ष कालीदास वाडेकर, उद्योजक रणजित कलाटे, गवारे दाजी,प्रा.सुशिलाताई मोराळे,सौ सारीकाताई सोनवणे,शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप,सचीन मुळुक,रा.कॉ श.प.गट जिल्हा अध्यक्ष राजेंद्र मस्के, नितीन कोटेचा,रमेश पोकळे, कुंडलीक खांडे, राजाभाऊ मुंडे,संपादक अजित वरपे, शेख तय्यब भाई, संतोष मानुरकर, पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी,उद्योजक सय्यद कौसर भाई, जगदीश काळे, बबनराव गवते, दिलीप गोरे,रमाकांत मुंडे, दादासाहेब मुंडे, शिवाजी मुंडे, नवनाथ थोटे, महेबुब शेख,मोईन मास्टर,फारोख पटेल,अँड.शफीक भाऊ,शेख निजाम, अविनाश नाईकवाडे, उद्योजक मुशतमीर पठाण, सर्जेराव तांदळे,प्रा.गोपाळ धांडे, वैजीनाथ तांदळे,बाप्पासाहे घुगे, जेष्ठ विधीतज्ञ अड सिध्देश्वर ठोंबरे, पी.एच. नहार , सी.ए.जाधव , सर्जेराव काळे,सुहास पाटील, नवसे पाटील, रमेश पाटील,मोराळे सर,अँड. गोविंद फड, शिवाजी सिरसाठ, बाबरी मुंडे,गोरख दादा रसाळ,विठ्ठल सानप, लाटे बाळु, जगदीश जाधव,मा.जि.प.सदस्य भारत बाप्पा काळे, अँड. हेमाताई पिंपळे, सुग्रीव रसाळ,अँड विवेकानंद सानप,अँड जयंत राख , अँड जगदीश शिंदे,सुभाष सपकाळ, भिमराव वाघचौरे, विनोद मुळुक, तानाजी कदम,मोहन भोसले, हेमंत खेडकर, ज्ञानेश्वर ढाकणे,पुरोशत्तम केंद्रे,भावजी, अशोक चांदगुडे, राकेश मिटकरी, विशाल पाटील, निलकंठ पालवे,टी.डी.मुंडे, बबनराव लोमटे, सय्यद अब्दुल्ला अबुसेठ,राजु जाधव, नवनाथ शिराळे,शुभम धुत,दिनकर कदम, अंकुश कळासे,लाला पाटील चौरे, राजरत्न जायभाये, मोहनराव झोडगे,बंडु मुळुक,पी.टी.गुंड पाटील, शंकर चव्हाण,सागर बहीर, श्रीराम बहीर ,नेकनुरचे सरपंच सौ अनिता सुंदर लांडगे, उपसरपंच सचिन शिंदे, हाजी फहीम सर,मा.पं.स.सदस्य पांडुरंग होमकर,माजी सरपंच दादाराव काळे, ग्रामपंचायत सदस्य सय्यद साजेद अली उर्फ बाबु भाई, फेरोज पठाण,पत्रकार सय्यद खालेद,माजी सरपंच सलीम पाशा,आजम पाशा, हाफेज वाजेद, अरविंद जाधव,ग्राम पंचायत सदस्य ईजहारोद्दीन जहागीरदार, शिवाजी शिंदे, अशोक शिंदे, जयदीप काळे, चक्रधर शिंदे, मुकुंद काळे,मुजीब आतार, जितेंद्र होमकर, सय्यद रिजवान, शेख रउफ पटेल,पत्रकार तुळजीराम शिंदे,मकसुद

पान १ वरून...

पैलवान,लालु जाहगीरदार,बाबा सर, शेख शाहेर दादा, लिंबाजी करांडे सर, फुलचंद नागरगोजे, अंकुश भस्मे,आदी धार्मिक,सामाजिक, राजकीय, शैक्षणिकसह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा शाही सोहळा थाटात संपन्न झाला. यावेळी उपस्थित सर्व मान्यवर पाहुणे मंडळी व सर्व उपस्थितांचे स्वागत व सत्कार नारायण बाप्पा शिंदे व आप्पासाहेब जगताप यांनी केले आहे.

ना.धनंजय मुंडे यांच्या दुरध्वनी वरुन शुभेच्छा

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या डोळ्यांवर मुंबई येथे तात्यासाहेब लाहने यांच्या रुग्णालयात शास्त्रक्रिया झाल्याने ते अती ईच्छा असुन सुद्धा लग्न समारंभात येऊ शकले नाहीत.म्हणून त्यांनी आपले जिवलग मित्र नारायण बाप्पा शिंदे व उपस्थित सर्वांची दिलगिरी व्यक्त केली. चि.ओमकार नारायण शिंदे आणि चि.सौ.कां डॉ सानिया यांना भावी जीवनात सुख समृद्धी लाभो हीच प्रभु वैद्यनाथांच्या चरणी प्रार्थना करतो अशा अंतःकरणातुन शुभेच्छा दिल्या. नारायण बाप्पा शिंदे हे कै. गोपीनाथराव मुंडे साहेब, कै पंडित अण्णांच्या पासून ते आज पर्यंत आगदी आमच्या जवळचे सहकारी असुन आजच्या या सोहळ्याला मी उपस्थित राहणं अपेक्षित होते. म्हणून मी पुन्हा सर्वांची क्षमा मागतो आणि सोळव्याच्या कार्यक्रमाला मी दिवसभर उपस्थित राहील अशा भावना व्यक्त केल्या आहेत.

**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ...**

निवड करण्यात आलेल्या कार्यकारिणीमध्ये सर्वश्री बीड जिल्हा उपाध्यक्षपदी बापू गाडेकर यांची निवड करण्यात आली. तर गेवराई तालुका अध्यक्षपदी अंकुश आतकरे यांची फेर निवड करण्यात आली. तर भागवत देशपांडे व राजेंद्र नाटकर यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तुळशीराम वाघमारे यांची तालुका सचिवपदी, अरविंद कुलकर्णी यांची सहसचिवपदी, विष्णू राठोड यांची कार्याध्यक्षपदी, शिवनाथ काळे यांची तालुका संघटकपदी, ज्ञानेश्वर जाधव तालुका कोषाध्यक्ष पदी तर कैलास हादगुले यांची गेवराई शहर अध्यक्षपदी निवड करण्यात आली. सचिन नाटकर, रामहरी काकडे, अकबर शेख, गणेश वीर यांची सदस्य पदी निवड करण्यात आली. यावेळी अनिल आगुंडे यांची डिजिटल मीडिया बीड जिल्हा अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे राज्य संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार अमोल कापसे, शिवसेना (उबाठा) तालुका उपप्रमुख शेख रफीक भाई, गंगावाडी सरपंच भास्कर हातागळे, भारतीय दलित पँथरचे तालुका अध्यक्ष कैलास पोटफोडे, मा. ग्रामपंचायत सदस्य जितेंद्र खरात व सामाजिक कार्यकर्ते वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या गेवराई तालुका अध्यक्ष पदासह उपाध्यक्ष व सर्व पदाधिकारी यांचे पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, राज्य सदस्य डॉ. प्रभू गोरे,मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत यांच्यासह महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य कार्यकारणीने अभिनंदन केले असून या नूतन कार्यकारणीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# नाशिकमध्ये जागतिक कृषी महोत्सवाचे ना. पंकजाताई मुंडेंच्या हस्ते थाटात उदघाटन

## लोकनेते मुंडे साहेबांच्या गुणांचा वारसा स्वीकारून लोक माझ्याशी जोडले गेले

**प्रतिनिधी ।** नाशिक

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांवर प्रेम करणाऱ्या लोकांची संख्या खुप मोठी आहे; त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांचा जर आपण एक साठा केला तर एक वेगळा पक्षच उभा राहील इतकी मोठी ताकद त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांमध्ये आहे. लोक मुंडे साहेबांच्या गुणांवर प्रेम करतात, त्यामुळे गुणांचा वारसा स्विकारुन ते माझ्याशी जोडले गेले अशा शब्दात राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशूसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

श्री स्वामी समर्थ कृषी विकास आणि संशोधन चॅरीटेबल ट्रस्ट, दिंडोरी आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक कृषी महोत्सवाचे उद्धाटन आज ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी शेतकरी बांधवांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. धुळ्याच्या खासदार शोभाताई बच्छाव, आ. सिमाताई हिरे, अण्णासाहेब मोरे, लक्ष्मण सावजी आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या, मुंडे साहेबांनी भारतीय जनता पक्षाच्या जन्मापासुन काम केले आणि तो पक्ष खऱ्या अर्थाने त्यांनीच उभा केला. महाराष्ट्रात भाजप रुजविण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांची संख्या खुप मोठी आहे. एवढे प्रेम करणाऱ्या लोकांचा जर आपण एक साठा केला तर एक वेगळा पक्षच उभा राहील



एवढं प्रेम लोकं त्यांच्यावर करतात.

नद्या पुनर्जीवित करणे गरजेचे

शहरीकरण आणि नागरीकरण वाढत असताना, पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन होणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि नद्या पुनर्जीवित करीत पर्यावरण संवर्धनासाठी सामुहीक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे त्या यावेळी म्हणाल्या.

वारकरी भवन चे लोकार्पण

श्रीक्षेत्र संत शक्तीधाम देवस्थान, येथे सुसज्ज व सर्व सुविधांनी परिपूर्ण वारकरी बांधवांसाठी साकारलेल्या नाशिक जिल्ह्यातील पहिल्या 'वारकरी भवन' चे लोकार्पण ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते झाले. हा सोहळा वारकरी बांधवांच्या सेवेसाठी नवी दिशा ठरणार असून भाविकांसाठी ही एक ऐतिहासिक आणि आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे असं त्या यावेळी म्हणाल्या. या सोहळ्यास अमृतधाम स्वामी महाराज, भाजपा आमदार सीमाताई हिरे, गुरूमाऊली अण्णासाहेब मोरे, गोविंद घुगे, कावेरीताई घुगे आदी उपस्थित होते.



# आ.सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते पाचरट कांदबरी प्रकाशन

**प्रतिनिधी ।** पाटोदा

पारगाव घुमरा ता.पाटोदा येथील प्रसिद्ध लेखक व सध्या श्री स्वामी भारती महाविद्यालय पिंपळवंडी येथे शिक्षक म्हणून कार्यरत असलेले अशोक नजान सर यांनी ऊसतोड मजुरांच्या आयुष्यातील व्यथा, खडतर परिस्थिती व आव्हानांचे वर्णन करणारी 'पाचरट' ह्या कादंबरीची रचना केली आहे. या कादंबरीचा प्रकाशन सोहळा ह.भ.प.गुरुदेव श्री.महादेवानंद भारती महाराज व आमदार सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते पाटोदा येथे पार पडला.

यावेळी बोलताना आमदार सुरेश आण्णा धस म्हणाले की अशोक नजान सर यांनी विविध वर्तमान पत्रासाठी अनेक लेख लिहिले आहेत. दैनिक सकाळच्या 'मैफल' पुरवणीत देखील त्यांच्या अनेक कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. आपल्या जिल्ह्यातील साहित्यिक म्हणून त्यांचा निश्चितच अभिमान आहे. मराठी साहित्यासाठी त्यांच्याकडून पुढील काळात देखील विपुल दर्जेदार साहित्य निर्माण व्हावे हिच सदिच्छा. तसेच'पाचरट' कादंबरी ला माझ्या अनेक शुभेच्छा. ही कादंबरी नक्कीच वाचकांच्या पसंतीस उतरेल. सर्वांनी ही कादंबरी वाचावी व वाचन संस्कृती टिकवावी असे आवाहन आमदार धस यांनी केले.

यावेळी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले श्री.तात्यासाहेब घुले, अँड. विजय जावळे (साहित्यिक), विठ्ठल जाधव(साहित्यिक), विष्णुपंत घोलप, शिवभूषण जाधव, गणेश कवडे, केशव रसाळ, भाऊसाहेब भवर, गुलाबराव भाऊ घुमरे, राजू भैय्या जाधव, हरिबप्पा घुमरे, दादासाहेब घुमरे (चेअरमन), अँड. महेश भोसले, डॉ.बाळासाहेब वारभुवन अँड. अनिल भोसले, महादेव जाधव (नगरसेवक) लावंड सर, उध्दव सान, बळीराम पोटे, गटनेते अँड. सुशील कोळेकर, शहानवाज सय्यद, संतोष जाधव, रोहीदास गिते, हनुमंत काळे, संदीप जावळे, स्वायकीय सहायक पत्रकार सोमीनाथ कोल्हे पत्रकार विलास भोसले, महेश बेदरे आजीज शेख व गणेश शेवाळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

# विद्यार्थ्यांनो मोबाईल बघण्यापेक्षा मैदानावर जा व मनसोक्त खेळा – प्रियंका इंगळे




**प्रतिनिधी ।** केज

दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ शनीवार रोजी भारतीय महिला खो-खो संघाची विश्वचषक विजेती कर्णधार कु.प्रियंका इंगळे यांनी आवाडएज्युकेशनल अकॅडमी केज च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून व छोट्याशा गावातून येवून भारतीय महिला खो खो संघाचे कर्णधारपद भूषविणाऱ्या प्रियांका यांनी या प्रसंगी बोलताना जिद्द,चिकाटी व सातत्य या त्रिसूत्री चा वापर करून यशाला गवसणी घालत येते असे सांगितले.विद्यार्थ्यांनी मोबाईल बघण्यापेक्षा मैदानावर मनसोक्त खेळावे खेळामुळे आरोग्य सुधारते व एकाग्रता वाढण्यास मदत होते असे ही सांगितले.विद्यार्थ्यांनी आहाराकडे विशेष लक्ष देण्याची सूचनाही त्यांनी या वेळी बोलताना केली. या प्रसंगी बोलताना त्यांच्या वडिलांनी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल सांगायला त्या विसरल्या नाहीत.एका विश्वविजेत्या कर्णधाराला ऐकण्याचा व पाहण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना वेगळाच आनंद देवून गेला.आवाड एज्युकेशन अकडमीचे संचालक डा.विठ्ठल आवाड सर यांनी आपल्या भाषणात म्हटले की,धन्यवाद प्रियंका दीदी,तुम्ही वेळात वेळ काढून आलात वआमच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनकेले त्याबद्दल तुमच्या पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

# पद्मजा कुलकर्णी यांचे दुःखद निधन

**प्रतिनिधी ।** मानुर

शिरूर शहरातील शिवाजीनगर येथील रहिवासी सौ.पद्मजा पद्माकर कुलकर्णी ( वय ५५) वर्ष या आहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार घेत होत्या. उपचारादरम्यान शनिवार ता.८ रोजी दुपारी दु :खत निधन झाले.

त्या मनमिळाऊ स्वभाव ,धार्मिक उत्सवात सहभाग घेत होत्या.त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुली , सुन नातवंडे असा परीवार आहे.शिरूर शहरातील आमरधाम मधे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळेस आधिकारी कर्मचारीवर्ग, व्यापारीवर्ग पत्रकार, डॉक्टर, नागरीक नातेवाईक ग्रामस्थ उपस्थितीत होते. त्या ब्राह्मण महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांच्या धर्मपत्नी होत्या.



# महाकरंडक चंपावती महोत्सवात खुशी चव्हाण हिने द्वितीय क्रमांक पटकावला



**प्रतिनिधी ।** बीड

ना.एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या वाढदिवसानिमित्त महाकरंडक चंपावती महोत्सव स्पर्धा दिनांक ०१/०२/२०२५ ते ०८/०२/२०२५ या कालावधीत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे संपन्न झाला.या कार्यक्रमात बीड शहर व जिल्ह्यातील अनेक शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.विविध समुहगीत, समुह नृत्य गीत, नाटिका, एकांकिका, एकपात्री अभिनय स्पर्धा सादर करण्यात आल्या होत्या.यामध्य डॉन्स स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला यासाठी शाळेचे संस्थापक सर्व संचालक, मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक यांनी खुशी चव्हाण हीचे अभिनंदन केले आहे.

# मुक्रमाबाद येथील जिल्हा परिषद हायस्कूल येथे शिष्यवृत्ती परीक्षा सुरळीत

**प्रतिनिधी ।** मुक्रमाबाद

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा घेतल्या जाणाऱ्या पुर्व उच्च प्राथमिक व माध्यमिक परीक्षा मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षा शांततेत पार पडल्या या परीक्षेत पुर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (२०२५) ५ वी च्या एकुण १५० विध्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी १३७ विध्यार्थी परीक्षा दिले असुन १३ विध्यार्थी अनुपस्थित होते पुर्व उच्च माध्यमिक व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा केंद्रावर केंद्रसंचालक म्हणून मदने एस.जी.हे अतीशय उत्कृष्ट रीतीने आपले काम पाहिले यावेळी बैठे पथक



म्हणून लाळे सर, वाघमारे सर यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा सुरळीत पार पडली पर्यवेक्षक म्हणून ढगे व्ही.सी,बिरादार ए.पी, पाटील एम.यु, पाटील पी.ए,अंकलवार पी आय,गुरमे एस.बी,नेलगे एस.के.यांनी काम पाहिले. अनुचित प्रकार घडु नये म्हणून पोलिस ठाणे मुक्रमाबाद येथील पोलिस सहाय्यक पोलीस निरीक्षक भालचंद्र तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली तग्याळकर व नरबागे सर यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# आमदार सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते पाचरट कांदबरी प्रकाशन

**प्रतिनिधी ।** पाटोदा

पारगाव घुमरा (ता.पाटोदा) येथील प्रसिद्ध लेखक व सध्या श्री स्वामी भारती महाविद्यालय पिंपळवंडी येथे शिक्षक म्हणून कार्यरत असलेले श्री.अशोक नजान सर यांनी ऊसतोड मजुरांच्या आयुष्यातील व्यथा, खडतर परिस्थिती व आव्हानांचे वर्णन करणारी 'पाचरट' ह्या कादंबरीची रचना केली आहे. या कादंबरीचा प्रकाशन सोहळा ह.भ.प.गुरुदेव श्री.महादेवानंद भारती महाराज व आमदार सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते पार पाटोदा येथे पार पडला.

यावेळी बोलताना आमदार सुरेश आण्णा धस म्हणाले की श्री.अशोक नजान सर यांनी विविध वर्तमानपत्रासाठी अनेक लेख लिहिले आहेत. दैनिक सकाळच्या 'मैफल' पुरवणीत देखील त्यांच्या अनेक कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. आपल्या जिल्ह्यातील साहित्यिक म्हणून त्यांचा निश्चितच अभिमान आहे. मराठी साहित्यासाठी त्यांच्याकडून पुढील काळात



देखील विपुल दर्जेदार साहित्य निर्माण व्हावे हिच सदिच्छा. तसेच'पाचरट' कादंबरी ला माझ्या अनेक शुभेच्छा. ही कादंबरी नक्कीच वाचकांच्या पसंतीस उतरेल. सर्वांनी ही कादंबरी वाचावी व वाचन संस्कृती टिकवावी असे आवाहन आमदार धस यांनी केले

यावेळी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले श्री.तात्यासाहेब घुले, अँड. विजय जावळे (साहित्यिक), विठ्ठल जाधव(साहित्यिक), विष्णुपंत घोलप, शिवभूषण जाधव, गणेश कवडे, केशव रसाळ, भाऊसाहेब भवर, गुलाबराव भाऊ घुमरे, राजू भैय्या जाधव, हरिबप्पा घुमरे, दादासाहेब घुमरे (चेअरमन), अँड. महेश भोसले, डॉ.बाळासाहेब वारभुवन अँड. अनिल भोसले, महादेव जाधव (नगरसेवक) लावंड सर, उध्दव सान, बळीराम पोटे, गटनेते अँड. सुशील कोळेकर, शहानवाज सय्यद, संतोष जाधव, रोहीदास गिते, हनुमंत काळे, संदीप जावळे, स्वायकीय सहायक पत्रकार सोमीनाथ कोल्हे पत्रकार विलास भोसले, महेश बेदरे आजीज शेख व गणेश शेवाळे

# अँपा डॉक्टर्स महिला क्रिकेट चषक स्पर्धा अंबाजोगाई

## सर्व डॉक्टर्सनी आपल्या शारीरिक तंदुरुस्तीची काळजी घ्यावी :- डॉ राजेश इंगोले

**प्रतिनिधी ।** अंबाजोगाई

अंबाजोगाई मेडीकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या अँपा डॉक्टर्स महिला चषक स्पर्धेत रॉयल फायर्स संघाने विजेतेपद पटकावले तर योगेश्वरी चॅम्पियन्स संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. विजेत्या व उपविजेता संघास इंडीयन मेडीकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतीक समिती अध्यक्ष डॉ राजेश इंगोले, अँपा संघटनेच्या अध्यक्षा डॉ सुलभा पाटील, उपाध्यक्ष डॉ सुनील नांदलगावकर,सचिव डॉ ऋषिकेश घुले,डॉ संदीप जैन,डॉ मनीषा पवार यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ राजेश इंगोले यांनी डॉक्टर्स



आपल्या व्यस्त आयुष्यात आपल्या अनेक आवडी निवडी विसरून जातात. प्रत्येक डॉक्टरमध्ये एक व्यक्ती म्हणून आपली आवड आपले छंद असतात. कुणी छान खेळ खेळतात, कुणी छान चित्रकार असतो, कुणी छान गायक, नर्तक नर्तिका, कलाकार, फोटोग्राफर असतात पण वैद्यकीय सेवा क्षेत्रात उतरल्यावर वेळेअभावी डॉक्टर्स मधील या अभिव्यक्ती लोप पावतात. अँपा डॉक्टर्स असोसिएशनच्या कर्तबगार महिला अध्यक्ष डॉ सुलभा पाटील यांनी प्रथमच अभिनवरीत्या डॉक्टर्स साठी विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करून डॉक्टर्समधील खेळाडूला जागृत केलं आहे याबद्दल त्यांचे आभार मानले. सर्व डॉक्टर्सनी आता हा जागृत झालेला खेळाडू आता लोप पावू न देता वर्षभर आपला शारीरिक फिटनेस कायम राखावा असे आवाहन केले. आपला व्यवसाय आपले पोट भरतो पण कलाक्रीडा कौशल्य आपलं जीवन जगणं समृद्ध करत आयुष्याला अर्थ देतात. त्यामुळे प्रत्येकाने आपली कला ,आपले छंद आयुष्यात जोपासून प्रत्येक क्षणाचा आनंद घ्यायला शिकावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत रमाई यांची जयंती साजरी

**प्रतिनिधी ।** केज

दि.७ फेब्रुवारी २०२५ शुक्रवार रोजी त्यागमूर्ती रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व राष्ट्रीय विज्ञान दिन विशेष या निमित्ताने दैनंदिन कार्यक्रम राबविण्यात येत असलेल्याने ब्रम्हगुप्त या गणिती व ज्योतिषशास्त्रज्ञ यांच्या प्रतिमेचे शाळा व्यवस्थापनसमितीअध्यक्ष संपत्ती सरवदे व उपाध्यक्ष सीमा मोहिते तसेचजिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ कदम यांनी पूजन करुन अभिवादन करण्यात आले.त्यागमूर्ती व बलिदानाची मूर्ती रमाई आंबेडकर यांचा जन्म वणंदगाव येथे दि.७ फेब्रुवारी १८९८ रोजी झाला.आई रुक्मिणी व भिकु धोत्रे हे वडील होते. त्यांचे लग्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झाले त्यांनी आपल्या पतीच्या कार्यात भक्कम साथ दिली.दि.१ फेब्रुवारी २०२५ ते दि.२८फेब्रुवारी २०२५ या कालावधीत राष्ट्रीय विज्ञानदिन विशेष साजरा करण्यात येत असलेल्याने ब्रम्हगुप्त या गणिती व ज्योतिषशास्त्रज्ञ यांचीही माहिती




दिली. ब्रम्हगुप्त हे भारतीय गणिती व ज्योतिषशास्त्रज्ञ होते.ते मारवाडातील भिनमाळ गावचे रहिवासी होते.ते इ.स.५९८ ते ६६५ या कालावधीत म्हणजे ७ व्या शतकातील गणित व ज्योतिषशास्त्रज्ञ होते. अशी माहिती श्री. राजाभाऊ कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी यांनीदिली. श्रध्दा सरवदे,प्रियंका देटे, प्रणव कांबळे,श्वेतासरवदे, मानसी सरवदे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या शाळेतील शिक्षक श्री. भारत हांगे,बाळासाहेब राठोड,श्रीमती गिताताई अंडील,श्रीमती सोनाली भुमकर यांनी सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इ.७ वी ची विद्यार्थिनी श्रध्दा सरवदे यांनी केले तर आभार प्रियंका देटे यांनी मानले.

# संत मीराबाई संस्थान येथे २७ जणांचे रक्तदान



**प्रतिनिधी ।** पाटोदा

संत मीराबाई आईसाहेब यांच्या २७ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहा दरम्यान शनिवार ८ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबीरात २७ दात्यांनी रक्तदान केले.सप्ताहाचे हे २७ वे वर्ष असुन महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार सेवा बजावत आहेत. महंतराधाताई महाराज यांच्या मार्गदर्शनाखली शिव महापुराण कथा होत असुन भाविक मोठ्या संख्येने लाभ घेत आहेत. दररोज महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबीरासाठी स्वामी सानप, किसन सानप, शिवाजीराव गर्जे, विठ्ठल सांगळे, संतोष गर्जे यांनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. सप्ताहाची भव्य रक्तदान शिबीर गर्जे संत मीराबाई संस्थान या ठिकाणी त्तदान शिबिर संपन्न झाले. सांगता. राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे उपस्थित राहणार आहेत.



# दिल्ली विधानसभेत भाजपाला बहुमत देगलूर मध्ये जल्लोष

देगलूर /प्रतिनिधी

**दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला बहुमत मिळाल्याचा आनंद साजरा करण्यासाठी देगलुर शहरात भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोष कार्यक्रम आयोजित केला. हा कार्यक्रम आ. जितेश अंतापूरकर यांच्या ऊपस्थितीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात पार पडला. भाजपा समर्थकांनी उत्साहात जल्लोष साजरा करत विजयाच्या आनंदात फटाके फोडले आणि एकमेकांना मिठाई वाटली. या वेळी उपस्थित नेत्यांनी जनतेचे आभार मानले व पक्षाच्या आगामी वाटचाली बाबत विश्वास व्यक्त केला.**

सभासद नोंदणी करणाऱ्यांचे सत्कार..

भाजप संघटनपर्व अंतर्गत भाजप सदस्य नोंदणी अभियानात देगलूर बिलोली विधानसभेतील भाजपा पदाधिकारी जनार्दन बिरादार, भावनाताई दाशेटवार, गणेश गुरुपवार यांनी एक हजार सभासदाचे नोंदणी पुर्ण केल्याबद्दल आ. जितेश अंतापूरकर यांनी त्यांचा सत्कार करुन अभिनंदन करत त्यांच्या पक्षीय कार्याचे कौतूक केले. यावेळी भाजपाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# आता स्मशानभूमी पण सुरक्षित नाही..!

## राजस्थानी स्मशान भूमीत गुंडाचा धुडगूस

## स्वर्ग रथ फोडला, मोटारसायकल जाळली



माजलगाव : शहरातील पावर हाऊस रोडवर सिंदफना काठावर राजस्थानी समाजाची सम्शानभूमी असून रविवारी सायंकाळी ७ वाजताच्या दरम्यान ५ ते ७ गुंडानी याठिकाणी घुसून उभा असलेला स्वर्गरथ फोडून टाकला. स्वर्ग थचे चालक बाबुभाई यांना मारहाण केली. शिवाय या ठिकाणी राहण्यास असलेले गंगाधर गायकवाड यांची मोटर सायकल पेटवून दिली. माजलगाव मध्ये पोलीस प्रशासन आहे की नाही अशी परिस्थिती असून रात्री १० च्या दरम्यान पुन्हा काही गुंडानी सम्शान भूमीत घुसून अर्धवट जाळलेली मोटर सायकल पुन्हा पेटवून दिली.

शहरातील पावर हाऊस रोड सिंधफना नदीच्या काठावर असलेल्या राजस्थानी समशानभूमी येथे अज्ञात ५ ते ७ गुंडानी येऊन स्वर्गरथाची तोडफोड केली आहे तसेच ड्राइव्हर बाबूभाई यांना मारहाण केली आहे. याठिकाणी मुक्कामी असलेल्या मसनंजोगी गंगाधर गायकवाड यांची मोटरसायकल जळण्याचा ही प्रयत्न ७ वाजता झाला यावेळी विरोध केला म्हणून स्वर्ग रथा चे चालक बाबुभाई यांना मारहाण केली. मोटर सायकल अर्धवट जळली असता रात्री पुन्हा१० वाजता येऊन गुंडानी ही मोटर सायकल जाळली.आता माजलगावची स्मशान भूमी पण सुरक्षित नाही.

राजस्थानी समाशानं भूमी चारी बाजूने बंदिस्त असल्यामुळे याठिकाणी रोटरी क्लब चा स्वर्ग रथ, शीतपेटी ठेवण्यात येते. शिवाय याठिकाणी गंगाधर गायकवाड यांचे कुटुंब ही वास्तव्यास असते. आजच्या या घटनेमुळे स्वर्ग थचे अतोनात नुकसान झाले असून चालक बाबू भाई यांनाही मार लागला

# राष्ट्र प्रथमच्या प्रेरणेसह 'युथ फॉर माय भारत' शिबिराचा समारोप

**प्रतिनिधी** । आष्टी

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे ब्रह्मगाव, ता. आष्टी, जि. बीड येथे आयोजित 'युथ फॉर माय भारत' विशेष हिवाळी शिबिराचा समारोप राष्ट्र प्रथमच्या प्रेरणादायी विचारांनी आणि सामाजिक बांधिलकीच्या संकल्पासह संपन्न झाला.

समारोप समारंभाचे अध्यक्ष ग्रामपंचायत सरपंच रोहिदास पवार होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निबोरे यांनी उद्याच्या भारतासाठी तुम्ही तरुण आहात या संकल्पनेवर विचार मांडले. या शिबिरातून तुम्हाला समाजसेवेचे, श्रमदानाचे आणि नेतृत्वाचे धडे मिळाले आहेत. समाजात वावरताना 'राष्ट्र प्रथम' या तत्वाचे पालन करा आणि जबाबदारीने कार्य करा, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सेवा योजना ध्वजाला मानवंदना देऊन करण्यात आली. यानंतर एन. एस. एस. गित झाले आणि ध्वज विधीपूर्वक उतरवण्यात आला.शिबिरातील सात दिवसांचा आढावा गट समन्वयक डॉ. रवी सातभाई यांनी सविस्तर अहवाल वाचनाद्वारे मांडला. स्वयंसेवक कु. साक्षी सानप आणि सोपान वांढरे यांनी आपले अनुभव कथन करत, या शिबिरातून आम्हाला समाज आणि ग्रामविकास यासाठी योगदान देण्याची संधी मिळाली, असे सांगितले.



यानंतर प्राचार्य डॉ. सोपानराव निबोरे यांनी स्वयंसेवकांना समाजातील जबाबदारीची जाणीव ठेवून कार्य करण्याचा सल्ला दिला. त्यांनी या शिबिरातून घेतलेले अनुभव आणि शिकवण तुमच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात परिवर्तन घडवतील, असे सांगत युवकांनी राष्ट्र प्रथम या विचाराने प्रेरित राहावे, असे आवाहन केले.ग्रामपंचायत सरपंच रोहिदास पवार यांनी अध्यक्षीय समारोप करताना या शिबिरामुळे गावात सकारात्मक चैतन्य निर्माण झाले. स्वच्छता, समाजसेवा आणि एकजुटीच्या मूल्यांची जाणीव झाली. भविष्यातही अशा उपक्रमांना ग्रामस्थांचा पूर्ण पाठिंबा असेल, असे सांगितले.या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी गट समन्वयक डॉ. रवी सातभाई, कार्यक्रम अधिकारी डॉ. सुहास गोपणे, डॉ. महेंद्र वैरागे, प्रा. शुभांगी खुडे यांनी विशेष मेहनत घेतली.संपूर्ण सात दिवस स्वयंसेवकांनी श्रमदान, पर्यावरण संवर्धन, व्यक्तिमत्त्व विकास आणि ग्रामविकास उपक्रमांमध्ये योगदान दिले.

# सार्वजनिक शिवजयंती उत्सव लिंबागणेश अध्यक्षपदी अशोक वाणी

लिंबागणेश : बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात दि. ८ फेब्रुवारी शनिवार रोजी सरपंच बालासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व उपसरपंच बाळकृष्ण थोरात,सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, डॉ . गणेश ढवळे, विक्रांत वाणी, संतोष भोसले, सुरेश निर्मळ,बाळकृष्ण मुळे,शंकर वाणी, पप्पू आवसरे ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात,अक्षय वाणी, अशोक जाधव, , समीर शेख, रमेश गायकवाड,यांच्या उपस्थितीत प्रतिवर्षी प्रमाणे सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२५ गठीत करण्यात आली

यावेळी नवनिर्वाचित समितीमध्ये अध्यक्षपदी अशोक वाणी, उपाध्यक्ष महेश ढवळे, सचिव सौरभ जाधव, सहसचिव दिनेश जाधव, कोषाध्यक्ष अशोक जाधव, सल्लागारपदी तुकाराम गायकवाड,वसीम शेख यांची तर सदस्यपदी महावीर वाणी, अभिजित गायकवाड, महावीर जाधव,औदुंबर नाईकवाडे,अभय वनवे, नितीन जाधव, सुभाष वाणी,बाबु शिंदे, ओंकार तागड, विक्की भोसले,अक्षय येडे ,अक्षय ढवळे, विजय आगवान,अमर आबदार, स्वप्निल वक्ते यांची निवड करण्यात आली.प्रास्ताविकात सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी मागील संपूर्ण वर्षभरात शिवजयंती उत्सव समितीकडुन झालेल्या कार्यक्रमांची संक्षिप्त स्वरूपात माहिती देत शिवजयंती उत्सवाची रूपरेषा आणि उत्सवाला अभिप्रेत असणा-या बाबी मांडल्या. डॉ.गणेश ढवळे यांनी गतवर्षी प्रमाणेच डीजेमुक्त शिवजयंती साजरी करत विविध पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन पोलिस प्रशासनाला सहकार्य करत आदर्शवत शिवजयंती साजरी करण्याचे आवाहन केले.यावेळी ग्रामपंचायत्या वतीने अध्यक्षपदी निवड झालेले अशोक वाणी व ईतर पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थित मोठ्या संख्येने उपस्थित ग्रामस्थांकडून निवडीचे स्वागत करण्यात आले.

# वै.महंत रामकृष्णमहाराज यांच्या पुण्यस्मरणानिमित्त वरपगाव येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह

## दि.११ ते १८ फेब्रुवारी दरम्यान नामांकित कीर्तनकाराचे कीर्तन,भागवत कथा व दिवसभर भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन

**प्रतिनिधी** । केज

श्रीक्षेत्र साधु शिवरामपुरी मठ संस्थान येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री संत नागेशपुरीजी महाराज वरपगावकर यांच्या पावन स्मृतीने पवित्र झालेल्या वरपगाव च्या भूमीमध्ये वैकुंठवासीमहंत रामकृष्ण महाराज वरपगावकर यांच्या १९ व्या पुण्यस्मरणानिमित्त दि.११ फेब्रुवारी २०२५ ते दि.१८ फेब्रुवारी २०२५या कालावधीमध्ये वरपगाव तालुका केज येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजनकरण्यातआलेले आहे.सदरील अखंड हरिनाम सप्ताहामध्ये विविध सुप्रसिद्ध कीर्तनकारांच्या कीर्तनाचे आयोजन केलेले असून याचा अलभ्य लाभ सर्व भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.यावेळी अनेक नामंवत सुश्राव्य कीर्तना मध्ये दि.११ फेब्रुवारी २०२५ रोजी ह.भ.प. जगन्नाथ महाराजदेशमुख पंढरपुरकर यांचे कीर्तन होईल,दि.१२ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.बाळु महाराज गिरगावकर दि.१३ फेब्रुवारी रोजीह.भ.प. महंत श्रीराम महाराज विडेकर.दि.१४ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.हरीहर महाराज दिवेगावकर यांचे किर्तन होईल तसेच दि.१५ फेब्रुवारी रोजी ह.भ.प विठ्ठल महाराज शास्त्री तर दि.१६ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन होईल. दि.१७ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.पांडुरंग महाराज क्षीरसागर यांचे किर्तन होईल तर काल्याचेकिर्तन दि.१८ फेब्रुवारी २०२५

रोजी मठाधिपती मठ संस्थान वरपगाव महंत ह.भ.प.भगवान महाराज वरपगावकर यांचे कीर्तन होईल.वरील सुप्रसिद्ध कीर्तनकार यांचा मेळा या ठिकाणी भरणार असून किर्तन हे संध्याकाळी सात ते नऊ या वेळेत होतील.तसेच अखंड हरिनाम सप्ताहामध्ये ह.भ.प.प.पु रामकृष्ण महाराज शास्त्री (काकाजी)आळंदीदेवाची याच्या सुमधुर वाणीतून दररोज श्रीमद भागवत कथेचे प्रवचन दोन ते चार वेळेत करण्यात येईल. सप्ताहाचे हे विशेष आकर्षण म्हणता येईल. दैनंदिन कार्यक्रमांमध्ये पहाटे चार ते सहाकाकडा भजन,सहा ते सात विष्णुसहस्त्रनाम,सात ते दहा ज्ञानेश्वरी पारायण, बारा ते एक भोजन व विश्रांती,दोन ते चार श्रीमद् भागवत कथा, पाच ते सहा हरिपाठ, सात ते नऊ हरिकीर्तन अशा प्रकारे नियोजन केलेले आहे.त्याचप्रमाणे इतरही विविधकार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.प्रतिवर्षी प्रमाणे या कार्यक्रमात केज



तालुक्यातील वरपगावच्या पंचक्रोशी तील शेकडो गावाच्या भाविक भक्तांचा सागर या ठिकाणी पहावयास मिळत असतो.वैकुंठवासी नागेश पुरी महाराज वरपगावकर,वैकुंठवासी रामकृष्ण महाराज यांचा आशीर्वाद घेण्यासाठी सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असेवरपगाव मठाचेमठाधिपती ह.भ.प. महंत भगवान महाराज शास्त्री वरपगावकर व वरपगाव ग्रामस्थ यांच्या वतीने परिसरातील सर्व भाविक भक्तांना आवाहन करण्यात आले आहे. दररोज संध्याकाळी ठिक सात वाजता किर्तन सेवा सुरू होणार आहे यांचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# माणसाने धनसंपत्ती कमविण्यापेक्षा सतंतीवर चांगले संस्कार करावेत – आचार्य भगवंत महाराज पुरी



## आडोळा येथे सर्व धर्मीय संगीत भागवत कथा व भव्य किर्तन महोत्सवाचे आयोजन

माजलगाव ( प्रतिनिधी ) आयुष्यात माणसाने धन संपत्ती कमविण्यापेक्षा सतंतीवर चांगले संस्कार करावेत जेणेकरून त्यांचे आयुष्य ते सोयीस्करपणे जगू शकतात असे आवाहन गेवराई तालुक्यातील भाटेपुरी पंचमुखेखर संस्थानचे आचार्य भगवंत महाराज पुरी यांनी आडोळा येथील भागवत सप्ताहातील भागवतकथा प्रसंगी भाविकांना केले

माजलगाव तालुक्यातील आडोळा येथे दि ०५ फेब्रुवारी पासुन सर्व जातीय व धर्मीय भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असुन या भागवत सप्ताहाची दैनंदिन कार्यक्रम पाहटे ४:०० ते ६:०० वाजता काकडा भजन, सकाळी ०७:०० ते १०:०० वाजता ज्ञानेश्वरी पारायण,११:०० ते १२:०० वाजता गाथा भजन,दुपारी १:३० ते ४:३० वाजता संगीत भागवतकथा,कथावाचक गेवराई तालुक्यातील भाटेपुरी येथील पंचमुखेखर संस्थानचे आचार्य भगवंत महाराज पुरी यांच्या अमृतमय वाणीतुन भाविकांना मंत्रमुग्ध करताता,तर संध्याकाळी ६:३० ते ७:३० वाजता हारीपाठ,रात्री ८:३० ते १०:०० यावेळेत महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांचा भव्य किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन दि १२ फेब्रुवारी बुधवारी रोजी काल्याचे किर्तन यशवाडी संस्थानचे श्री १००८ आचार्य श्री स्वामी शिवेंद्र चैतन्य महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार असुन काल्याच्या किर्तना नंतर आडोळा येथील सर्व जातीय व धर्मीय ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन केले असुन आडोळा परिसरातील सर्व भाविक-भक्तांनी संगीत भागवत कथेचा,भव्य किर्तन महोत्सवाचा,तसेच काल्याच्या किर्तनाचा महाप्रसादाचा लाभ घ्यावा

# नौकरी हे जगण्याचे एक साधन आहे गटशिक्षण अधिकारी लक्ष्मणराव बेडसकर

**प्रतिनिधी** । केज

दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी साने गुरुजी निवासी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये इयत्ता दहावी,बारावीच्या निरोप समारंभ निमित्त गटशिक्षणाधिकारी श्री. लक्ष्मणराव बेडसकर हे बोलत होते.साने गुरुजी निवासी विद्यालय हे एक केज तालुक्यातील आदर्श विद्यालय आहे.शिक्षणा पासून कोसो दूर असणाऱ्या वंचित घटकासाठी चालणार हे विद्यालय एक आदर्श विद्यालय ठरलं आहे या विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विचाराची प्रगल्भता उत्कृष्ट आहे. त्यामुळे पुढील जीवनात ते डॉक्टर ,इंजिनियर जरी बनले नाही तरीएकआदर्श नागरिक म्हणून जीवन नक्कीच जगतील त्याच बरोबर नोकरी हे जगण्याचे एक साधन आहे.मात्र ते एकमेव नाही याचा विद्यार्थ्यांनी विचार करावा.आज जरीएखाद्या विद्यार्थ्यास कमी श्रेणीचे मार्क असतील तरी त्याने ठरवल्यानंतर तो उच्च कोटीतील पाहिजे त्या क्षेत्रामध्ये भरारी घेऊ शकेल.विद्यार्थ्यांना कोणी कितीही काहीही शिकवायचे म्हटले तरी विद्यार्थ्यांमध्ये मुळातच उपजत ८० टक्के गुण असतात २०% गुण शाळा महाविद्यालय,खाजगी शिकवण्या यातून मिळत असतात.तेव्हा इतरआणि शिकवले म्हणून मुले शिकणार नाहीत मुलांनी शिकायचे ठरवले की मुले शंभर टक्के शिकतात. क्रिकेट विश्वात दहावी अनुत्तीर्ण असणारा सचिन तेंडुलकर जगावर अधिराज्य गाजवले आहे. तर गान कोकिळा लता मंगेशकर यांचीही त्यांनी उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना शिक्षणात भरारी घेण्यासाठी प्रेरणा दिली.तसेच मी एक शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक काम करणारा अधिकारी आहे. विद्यार्थ्यांनो तुम्हाला शिक्षण घेत असताना कोणत्याही प्रकारची गरज पडली तर सदैव माझी दारे आपणासाठी उघडे आहेत असेहीत्यांनी विद्यार्थ्यांना आश्वासित केले.तसेच कराड दांपत्याने या शाळेला वाहून घेतले आहे असे गौरव उद्गार यावेळेस काढले.कार्यक्रमाचे अध्यक्ष अड.उद्धवराव कराड यांनीहीविद्यार्थ्यांना कोठे जायचे आहे हे ठरवल्याशिवाय मार्ग सापडत नाही रस्ते अनेक आहेत जर आपण कोठे जायचे हे ठरवले तर रस्ता नक्कीच सापडेल.जग खूप मोठे आहे आपल्या छोट्या विश्वातून बाहेर या व ध्येय निश्चितकरा.भरारी घेण्यासाठी सिद्ध व्हाअसे आवाहन विद्यार्थ्यांना केले व आपल्या जीवनात कुठेही तुम्हाला गरज भासली तर निश्चितच साने गुरुजी विद्यालय सदैव आपल्या पाठीशी असेल असे मत व्यक्त केले.यावेळी वस्तीगृह अधीक्षक बाबासाहेब चाटे सर,सुदर्शन



चोले सरयांनी आपले मनोगत व्यक्तकेले तर विद्यार्थ्यांनी शाळे विषयी आपले मत मांडले या कार्यक्रमाचेप्रास्ताविक शाळेच्या प्राचार्य कविता कराड मॅडम यांनी केले तर सूत्रसंचालन जोशी मॅडम यांनी केले यावेळी मंचावर वस्तीगृह अधीक्षिका लहाने मॅडम, भांगे सचिन,काळे सचिन, चाटे लहु,पवार ज्ञानेश्वर, चंपाकला वडमारे या उपस्थित होत्या.या कार्यक्रमास इयत्ता दहावी व बारावीचे सर्व शिक्षक व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.




राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष बळकट करण्यासाठी प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी विभागाच्या प्रदेश सरचिटणीस पदी गंगाधर तुळशीराम भांगे यांचे नियुक्ती करण्यात आली

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड -४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत). का.संपादक : शेख आयेशा

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122(MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

# अण्णा हजारे किती चूक ! किती बरोबर ? -हनुमंत भोसले

सामाजिक क्षेत्रात मोठी झालेली माणसे जेव्हा चुकतात तेव्हा त्यांच्या बद्दल बोलताना किंवा ऐकताना फार विचार करून व्यक्त व्हावं लागतं. नुकताच दिल्लीच्या विधानसभानिवडणुकीचा निकाल घोषित झाला.या निवडणुकीत आमआदमी पक्षाचा मोठा पराभव झाला त्यांना ७० पैकी केवळ २२जागा मिळाल्या या निकालानंतर संपूर्ण देशामध्ये वेगवेगळ्या प्रतिक्रिया येऊ लागल्या. अरविंद केजरीवाल व त्यांच्या पक्षाबद्दल वेगवेगळी मते व्यक्त होऊ लागली.यामध्ये संपूर्ण मीडियामध्ये जीप्रतिक्रिया ठळकपणे अधोरेखीत झाली ती होती महाराष्ट्राचे ज्येष्ठ समाजसेवक माननीय अण्णा हजारे यांची प्रतिक्रिया !

अण्णा हजारे यांनी अरविंद केजरीवाल यांना दोष देत त्यांनी पक्ष व राजकारण यात पडायला नको होतं अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.अण्णा हजारे हे महाराष्ट्राचे ज्येष्ठ समाजसेवक आहेत खरे पाहता त्यांनी एकेकाळी समाजातील वाईट आणि चुकीच्या प्रवृत्ती विरोधात मोठा लढा देताना खूप मोठे योगदान दिले आहे. भ्रष्टाचार निर्मूलन जन आंदोलन किंवा माहिती अधिकाराचा कायदा या गोष्टी महाराष्ट्राला मिळाल्या त्या केवळ अण्णा हजारे यांच्या अथक परिश्रमातून आणि त्यांनी उभे केलेल्या आंदोलनातूनच याबाबत कोणालाही शंका असण्याचे कारण नाही. राळेगण सिद्धीच्या ग्रामविकास,पाणी आडवा -पाणी जिरवा,व्यसनमुक्ती यासारख्या सामाजिक मुद्यावर त्यांनी महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेणारे कार्य केले.म्हणूनच त्यांच्या भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनात माझ्यासारखे अनेक लोक सक्रिय होते. या जनआंदोलनाचे मी केज तालुक्याचे नेतृत्व अनेक वर्षे केले.अण्णा एक कृतिशील जन आंदोलक होते.मात्र ते वैचारिक दृष्टया परिपक्व नक्कीच नव्हते.त्यामुळे सततच्या उपोषण अजेंड्या बाहेर त्यांना वैचारिक मुद्याआधारे शासनाला फारसे नमवता आले नाही. त्या त्या वेळीच्या शासनाने त्यांचे जनआंदोलन लोकांनी हातात घेऊ नये याची काळजी घेत त्यांच्या कांही मागण्या मान्य केल्या ज्यामध्ये माहिती अधिकार व इतर कांही महत्वाच्या बाबीचा समावेश आहे.त्यांच्या चांगल्या कार्याबद्दल त्यांचे कौतुकच ! मात्र जगातील कोणताच व्यक्ती आपले यश,जनसमर्थन व त्यातून मिळालेल्या प्रसिद्धीच्या अहंकारातून सुटलेला नाही मग तो राजकारणा तील लोकप्रतिनिधी असो,समाजसुधारक असो की आजच्या काळातील साधू-संत असोत प्रसिद्धीझोताच्या वलयाखाली ते स्वतःला नियंत्रित ठेवू शकले नाहीत.अशा लोकांनी आपापल्या क्षेत्रात आपल्यापेक्षा कोणी मोठे होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात राळेगणसिद्धी सारखी दुसरी आदर्श गावे महाराष्ट्रात दिसली नाहीत.जी कांहीथोडीफार पुढे आली ती स्वतःच्या ताकदीनेच.नसता अण्णांनी प्रयत्न केला असता तर निश्चित अशी अनेक गावे उभी राहिली असती.आज दिल्ली पराभवानंतर मा.अण्णा हजारे यांनी अरविंद केजरीवाल यांच्यावर केलेली टीका निव्वळ पोरकटपणा वाटतो.आज देश व राज्यातील राजकारणाने अत्यंत खालची पातळी गाठली आहे.प्रामाणिकपणा किंवा इतर चांगली मूल्ये बाळगणाऱ्यांना



राजकारणात जायचं म्हटलं तर अशक्य बाब झालीय.राजकारणात जायचं तर तुमच्या विचारांना अजिबात स्थान नाही.तुम्हाला संबंधित राजकीय पक्षाचीवैचारिक व इतर कृतिशील गुलामगिरी स्वीकारूनच प्रवेश घ्यावा लागतो.आज जरी दिल्लीत आमआदमी पक्षाचा पराभव झाला असला तरी भाजप सारख्या पक्षाला गेली बारा वर्षे देशाच्या राजधानीतील सत्तेपासून दूर ठेवणं सोपं काम नव्हतं.लोक प्रचंड आशावादी आहेत.तरीही बारा वर्षे या पक्षाने दिल्लीच्या मतदारांची मने जिंकून सत्ता मिळवली होती हे कांही कमी नव्हते.अण्णा हजारे नेहमी देशातील स्वच्छ प्रतिमा असणाऱ्या युवक नागरिकांनी राजकारणात यावं असं आवाहन करतात तर मग आम्ही त्यांनी विचारू इच्छितो की जर आपण अरविंद केजरीवाल व त्यांच्या सहकाऱ्यांनी देशाच्या राजकारणात पर्याय म्हणून पक्ष काढून राजकारणात उतरले असतील तर त्यांनी चूक केली असे का म्हणता? तर मग चांगल्या व इच्छुक लोकांनी आज भ्रष्टाचाराचे आरोप असणाऱ्या काँग्रेस, भाजप,राष्ट्रवादी व शिवसेना अशा पक्षात जावं का? हे पक्ष तर प्रवेश घेण्यापूर्वीच आपल्या विचार व कार्याच्या अटी समोर ठेवतात ज्या मान्य करूनच त्यांच्या पक्षात प्रवेश घावा लागतो.अशा तो व्यक्ती कितीही चांगल्या विचार व कृतीचा असला तरी तो त्या पक्षात आपल्या स्वतःच्या मता नुसार काम करण्यास स्वतंत्र नसतो.तर मग राजकारणात चांगल्या माणसांनी येण्याचा काय उपयोग ? अशा वेळी अण्णा हजारे यांनी आजच्या राजकारणाला पर्याय म्हणून पुढे आलेल्या आम आदमी पक्षाला मोठ्या मनाने सहकार्य करायला हवे होते.पाहिजे तर अण्णा हजारे यांनी या पक्षाला कांही नियम व अटीची आचारसंहिता घालून दिली असती तरी चालले असते.परंतु राजकारणात उतरलेल्या अरविंद केजरीवाल व सहकाऱ्यांची प्रतिमा आपल्या सामाजिक करण्यापेक्षा अधिक उंचावत असल्याचे पाहून अण्णांनी चक्क अरविंद केजरीवाल व आपला टीकेचे लक्ष बनवले ही त्यांची कृती त्यांची मोठी चूक होती. तसं पाहिलंतर अण्णा हे महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रातील जेष्ठ समाजसेवक आहेत.ते महाराष्ट्राला नक्कीच परिचित होते.मात्र दिल्ली आंदोलनापूर्वी ते संपूर्ण देशवासियांना नक्कीच परिचित नव्हते.अण्णानां देशपातळीवर ओळख निर्माण करून देशाच्या प्रसिद्धी झोतात आणले ते अरविंद केजरीवाल व त्यांच्या टीमच्या आंदोलनानेच.यापूर्वी अण्णांचे कोणतेच आंदोलन महाराष्ट्राच्या बाहेर झालेले नव्हते. अपवादाने एखादे झाले असले तरी त्याला फार मोठे वलय प्राप्त झालेले नव्हते.याची जाणीवही अण्णांनी ठेवायला हवी होती.तसेही सध्या अण्णा हे ठराविक पक्षांच्या सरकार विरोधातच आंदोलने करतात व इतर वेळी शांत बसतात असा मोठा आरोप महाराष्ट्राच्या बहुसंख्याकांच्या तोंडातून स्पष्टपणे ऐकायलामिळतो आहे जो खरा वाटूलागतो. खरं तर मी एकेकाळचा अण्णांचा कट्टर कार्यकर्ता होतो.पण मी माझे डोके वापरतो.मी चांगल्या विचार कार्याचा समर्थक नक्कीच आहे पण ज्या लोकप्रतिनिधी,समाज सेवक किंवा अध्यात्मिक महाराजांवर,किर्तनकारा वर मी विश्वास ठेवलाआहे तो जर चुकला असेल तर त्याला चूक म्हणून त्याचा निषेध करण्याचं सामर्थ्य माझ्यात आहे.असे लोक चुकले तरी त्यांचे शिष्यत्व करत राहणारी मानसिक गुलामगिरी मी नाकारतो. म्हणून एकेकाळी अण्णांचं कट्टर समर्थन करत केज शहरातत्यांच्या सभा घेणारा मी आणि आज त्यांच्याबद्दलवास्तव लिहिताना त्यांच्यावर त्यांची चूक दाखवणारा मी कांहीना आवडेल असंही नाही.आजअण्णा, अरविंद केजरीवाल व त्यांच्या सहकाऱ्यांनी राजकारणात जाऊन चूक केली म्हणत असतील तर मग राजकारणात चांगली माणसे काय आभाळातून खाली पडणार आहेत का? आज गावात सरपंचांविरोधात तोंड उघडायला लोक भितात तर मग भाजपसारख्या बलाढ्य पक्षाच्या साम-दाम-दंड नीतीला भेदून दिल्लीत २२ जागा मिळवणाऱ्या आमआदमी पक्षाचे कौतुकच व्हायला हवे.म्हणून मा.अण्णा हजारे यांनी आजपर्यंत दिलेल्या सामाजिक योगदानासाठी आम्ही त्यांचे शंभर वेळा कृतज्ञता व्यक्त करून आभार मानू मात्र त्यांच्या आजच्या चुकीच्या भूमिकेचे अजिबात समर्थन करता येणार नाही...!

# ११८ आरोपी, महसूल, पोलीस विभागात सर्वाधिक लाचखोरीची प्रकरणे

गडब/सुरेश म्हात्रे

शासन आपला कारभार भ्रष्टाचार मुक्त करण्याचा प्रयत्न करीत असले तरी लाचखोरी करण्याची प्रवृत्ती कमी होताना दिसत नाही. कोकणातील ठाणे, पालघर, नवी मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे सहा जिल्ह्यांमध्ये गेल्या वर्षभरात लाचखोरीची ६६, अपसंपदा ७ आणि इतर भ्रष्टाचाराचा एक अशी ७४ प्रकरणे दाखल झाली आहेत. यात एकूण ११८ आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. २०२३ च्या तुलनेत गेल्या वर्षी भ्रष्टाचाराची प्रकरणे कमी आहेत. २०२३ मध्ये एकूण भ्रष्टाचाराचे १०३ गुन्हे दाखल होते.शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांना आपली काम करवून घेताना नेहमीच अडचणींना सामोरे जावे लागत असते. नागरिकांना शासकीय कार्यालयामध्ये चांगली तत्पर सेवा मिळावी म्हणून शासन उपाययोजना करीत असते. नागरिकांची कामे वेळेत आणि नियमाप्रमाणे व्हावीत यासाठी शासनाने नियमावली जाहीर केलेली असते. मात्र सर्वसामान्य नागरिकांना आपली कामे करवून घेताना अडवणुकीचा सामोरे जावे लागते. अगदी चतुर्त श्रेणीपासून ते प्रथम वर्गाच्या अधिकाऱ्यांकडून नागरिकांची अडवणूक होत असते. अनेक वेळेला होणाऱ्या त्रासामुळे नागरिक शासकीय कार्यालयाची पायरी चढण्यास धजावत नाहीत.



गेल्या वर्षभरात कोकण विभागातही भ्रष्टाचाराची प्रकरणे सुरुच आहेत. राज्याच्या लाचलुचप्रतिबंधक खात्याच्या ठाणे विभागांतर्गत ठाणे, पालघर, नवी मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांचा समावेश आहे. १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ दरम्यान भ्रष्ट्राचाराचे ७४ गुन्हे दाखल झाले आहेत.ठाणे जिल्हयात पोलीस विभाग, महसूल, महानगरपालिका, अन्न व औषध प्रशासन, सहाय्यक दुय्यम निबंधक आणि ग्रामपंचायत या विभागांमध्ये लाचखोरीची सर्वाधिक प्रकरणे दाखल झाल आहेत. रायगड जिल्हयात महसूल, पोलीस, आरोग्य, भूमी अभिलेख या विभागांतील भ्रष्टाचाऱ्यांवर लाचल चपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली आहे.२०२३ मध्ये अधिक गुन्हे

२०२४ या वर्षात लाच मागणे, अपसंपदा आणि इतर भ्रष्टाचाराचे एक अशी ७४ गुन्हे दाखल असून यात ११८ जणांवर गुन्हा दाखल आहेत. मात्र २०२३ मध्ये भ्रष्टाचाराच्या प्रकरणांची संख्या अधिक होती. लाच मागीतल्या प्रकरणी १०३ प्रकरणांमध्ये १४४ जणांवर गुन्हा दाखल झाला होता. तर अपसंपदा व इतर भ्रष्टाचाराचा एकही गुन्हा दाखल नव्हता.

रत्नागिरी जिल्हयातील महसूल, भूमी अभिलेख, सहकार विभागातील भ्रष्टाचाऱ्यांना चाप लावला आहे. पालघर जिल्हयात वनविभाग, आरटीओ, महसूल, भूमीअभिलेख, वीज वितरण विभागातील भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई केली आहे. नवी मुंबई विभागातील मनपा, पंचायत समिती, महसूल, वीज वितरण, पोलीस विभागातील लाचखोरांवर सापळा लावून कारवाई केली आहे. १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या एक वर्षाच्या कालावधीत राज्य लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या ठाणे विभागातील सहा जिल्ह्यात लाच मागितल्या प्रकरणी ६६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात ९८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपसंपदा प्रकरणी सात गुन्हे दाखल असून यात १५ आरोपी आहेत. अन्य भ्रष्टाचाराच्या प्रकरणाचा एक गुन्हा असून ५ आरोपी आहेत. गेल्या वर्ष भरात लाच मागणे, अपसंपदा आणि इतर भ्रष्टाचाराचे एक अशी ७४ गुन्हे दाखल असून यात ११८ जणांवर गुन्हा दाखल आहेत.

# शैक्षणिक संकुलात पेट्रोल बॉम्बचा भ्याड हल्ला!

गडब/सुरेश म्हात्रे

पेण शहरातील म्हाडा कॉलनी येथील असणाऱ्या पेण शिक्षण महिला समितीच्या श्रीमती सुमतीबाई वि. देव शैक्षणिक संकुलाच्या आव ारात दि. २ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास अज्ञात समाजकंटकांकडून काचेच्या बाटलीत पेट्रोल बॉम्ब टाकून याद्वारे भ्याड कृत्य करून विद्यार्थ्यांना धाचरविण्याचा प्रयत्न करणाऱ्या घटनेचा जाहीर निषेध पेण शिक्षण महिला समितीच्या संचालक मंडळाने केला असून याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे की



सदर विद्यालयामार्फत दि.१ ते २ फेब्रुवारी बादरम्यान संकुलाच्या आवारात स्काउट गाइड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिर यशस्वी पार पडत असताना दि.२ फेब्रुवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास काही अज्ञात समाजकंटकांनी संकुलाच्या आवारात स्काऊट गाईड साठी उभारण्यात आलेल्या तंबूबर तीन काचेच्या बाटली द्वारे पेट्रोल बॉम्ब टाकून म्याड हला करत विध्वंस करण्याचा प्रयत्न करत असल्याचे लक्षात आले असता तात्काळ त्या ठिकाणची आग पाण्याच्याद्वारे विझविण्यात आली यामध्ये कोणतीही जीवित हानी झाली नाही मात्र असे वृत्त करणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरोधात तात्काळ पेण पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस याबाबत तपास करत आहेत.सदर घटनेची माहिती मिळताच सदर शैक्षणिक संकुलात जाऊन पोलिसांनी जागेची पाहणी केली आहे ज्या समाजकंटकांनी शाळेच्या आवारात बाटली द्वारे पेट्रोल बॉम्ब टाकण्याचा प्रयत्न केला आहे त्याचा तपास करण्यात येत आहे शाळेचे सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असून उर्वरित आजूबाजूचेही सीसीटीव्ही कॅमेरे तपासले जातील लवकरच यातील आरोपीचा शोध घेण्यात येईल.

संदीप बागुल - पोलीस निरीक्षक पेण



# बोधेगाव मधील निर्घृणपने हत्या झालेला पुजारी हिंदूच असूनही. ..

## हिंदुत्वसाठी गळा काढणारे हिंदुत्ववादी नेते कोणत्या बिळात जाऊन बसलेत - प्रा किसन चव्हाण

शेवगाव ।प्रशांत बाफना

शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील पहिलवान वस्तीवरील पहिलवान बाबा मंदिरातील हत्या झालेला पुजारी हिंदू असूनही हिंदुत्वसाठी गळा काढणारे हिंदुत्ववादी नेते हत्या झालेल्या पुजाऱ्याच्या पीडित कुटुंबाकडे फिरकले देखील नाही किंवा साधा निषेध देखील व्यक्त केला नाही. मंदिरातील सेवेकऱ्यांची प्रजासत्ताक दिनी झालेली हत्या ही क्रूर हत्या असून या घटनेमध्ये जो एक आरोपी पकडला आहे. तो सदर घटनेत एकटा नसून त्याला इतरही साथीदार असल्याशिवाय अशी भयानक घटना घडणार नाही तेव्हा इतरही मारेकऱ्यांचा तात्काळ शोध घेऊन त्यांना फाशिची शिक्षा होणे गरजेचे आहे असे मत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सदस्य तथा प्रदेश उपाध्यक्ष प्रा किसनराव चव्हाण यांनी व्यक्त केले.बोधेगावातील निर्घृणपने हत्या झालेल्या मयत दहातोंडे यांच्या नागलवाडी येथील पीडित कुटुंबाची प्रा किसन चव्हाण यांनी सांत्वनपर भेट घेतली यावेळी जय भागवनबाबा महासंघाचे बाळासाहेब सानप हेही उपस्थित होतेयावेळी घटनेचा निषेध व्यक्त करतांना प्रा किसन चव्हाण म्हणाले की ,खुनातील एका आरोपीच्या मुसक्या पोलिसांनी जरी आवळल्या असल्या तरी ही घटना एक आरोपी करू शकत नाही इतर साथीदार असल्याशिवाय हे हत्याकांड होऊच शकत नाही असे सांगून घटना घडल्यापासून अनेकांनी आरोपी कोण आहे या बाबत पोलिसांना कळऊनही पोलिसांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यानेच मयत दहातोंडे यांचे मृतदेहाची खूप मोठी हेळसांड झाली असून या कामी पोलिसांनाही जबाबदार धरावे असे सांगून फुले, शाहू व आंबेडकरांचे राज्य म्हणणारे या राज्यातील पुरोगामी विचारसरणीच्या सर्वच पक्षातील राज्यकर्ते आता कुठे गेले आहेत ? त्यांना झालेली ही घटना दलित व्यक्तीची असल्यामुळे यावे असे वाटले नाही का? दलित असला तरी हिंदू आहे ना पुजारी आहे ना असाही प्रश्न शेवटी चव्हाण यांनी उपस्थित केलाया वेळी बाळासाहेब सानप यांनी दहातोंडे यांच्या कुटुंबियांना रोख स्वरूपात ५० हजार रुपयाची मदत म्हणून दिली आहे यावेळी जय भगवान महासंघाचे गणेश साबळे, बाबासाहेब नरवडे, काका पाटेकर, रावसाहेब हिवराळे, निलेश गिरी, सतिष जैस्वाल, बाबासाहेब जाधव विकी निंबाळकर यांचेसह वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाउपाध्यक्ष शाहूराव खंडागळे, वंचितचे युवा नेते सुनिल खंडागळे, अरुण झांबरे बाळासाहेब ढाकणे,केशव चेमटे, आंबादास सानप, हारून शेख, वसंत साबळे, प्रथमेश सोनवणे, संतोष चिंतामणी, संतोष बाणाईत, वसंत आव्हाड, गोरख तुपविहिरे यांचेसह असंख्य कार्यकर्ते व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते

# श्री चक्रधर स्वामी (जाळीचा देव) यात्रा १० फेब्रुवारी पासून.भाविक भक्त दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने येतात

सावळदबारा ।प्रतिनिधी

अजिंठा पहाडात वसलेली श्री चक्रधर स्वामींची दोन मंदिरे अर्थातच जाळीचा देव या नावाने प्रसिद्ध असुन दरवर्षी दांडी पौर्णिमेला येथे भव्य यात्रा भरते. आठवडाभर चालणा-या या यात्रा महोत्सवासाठी भाविक भक्त मोठ्या संख्येने येथे येतात.तसेच जवळपासच्या १० ते १२ तालुक्यातील भाविक भक्त या ठिकाणी दर्शन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात येतात.





दि.१० फेब्रुवारी पासून यात्रा सुरूवात होणार आहेत सावळदबारा येथील श्री चक्रधर स्वामी मंदिर व याचं मंदिरापासून काही अंतरावर असलेल्या जाळीचा देव मंदिर आहेत या दोन्ही ठिकाणी भाविक भक्त दर्शन घेण्यासाठी येतात. सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामींचे मंदिर आहे या ठिकाणी दांडी पौर्णिमेच्या दिवशी मोठ्या संख्येने भाविक भक्त दर्शन घेण्यासाठी विविध राज्यांतील भाविक भक्त येतात.अजिंठा पहाडाच्या पायथ्याशी सावळदबारा या गावी श्री चक्रधर स्वामींचे (जाळीचा देव) अतिप्राचीन मंदिर आहे याचं मंदिरापासुन अजिंठा पहाडाच्या माथ्यावर श्री चक्रधर स्वामींचे (जाळीचा देव) दुसरे मंदिर आहे श्री क्षेत्र जाळीचा देव म्हणून दोन्ही मंदिरे प्रसिद्ध आहेत श्री चक्रधर स्वामींना महानुभाव पंथाचे आद्य संस्थापक म्हणून ओळखले जाते.सावळदबारा येथे पहाडाच्या पायथ्याशी श्री चक्रधर स्वामीचे एक मंदिर व डोंगर माथ्यावर दुसरे मंदिर अशी दोन मंदिरे आहेत.भाविक भक्त दोन्ही मंदिरात एकाच दिवशी दर्शन घेतात भाविकांच्या मनोकामना पूर्ण होतात. दोनही मंदिरांमध्ये पंचधातूपासुन बनविलेल्या श्री चक्रधर स्वामी म्हणजेच जाळीचा देवाच्या अतिभव्य व प्राचीन मूर्त्या आहेत तसेच अजिंठा पहाडात अनेक लहान मोठी मंदिरे आहेत.सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामींचे दर्शन घेण्यासाठी विविध राज्यातील भाविक भक्त या ठिकाणी मोठ्या संख्येने येतात तसेच सावळदबारा येथे पालखी सुद्धा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात येतात या ठिकाणाहून दर्शन घेऊन इथूनच काही अंतरावर असलेल्या डोंगरातून या वरच्या मंदिरावर जाण्यासाठी जवळपास ८०० च्या वर पायऱ्या आहेत सावळदबारा येथील श्री चक्रधर स्वामीचे दर्शन घेतल्यानंतर जाण्यासाठी याच ठिकाणी डोंगरातून पायी जावे लागते डोंगरातून जाताना संपूर्ण हा भाग डोंगराळ भाग आहे सावळदबारा येथील श्री चक्रधर स्वामी मंदिर पासुन सुमारे ८०० च्या वर पाय-यां चढल्यानंतर वरच्या श्री क्षेत्र जाळीचा देव मंदिरात जाता येते .

अजिंठाच्या कुशीत पाचिझीरा.कालिंका देवी मंदिर .दावनेश्वर मंदिर.महादेव मंदिर.अशी अनेक नयनरम्य ठिकाणे पाहण्यासारखी आहेत.देवदर्शनासोबत येथे निसर्ग अनुभवास मिळत असल्याने विविध राज्यातील भाविक भक्त येथे येतात. सावळदबारा हा भाग संपूर्ण डोंगर भाग असल्याने डोंगरातून ये .जा. मोठ्या प्रमाणात भाविक भक्त करत असतात याच गिरडा घाटामधून मोठ्या प्रमाणात भाविक भक्त सावळदबारा येथे येतात.

# बेटमोगरा येथे त्यागमुर्ती महामाता रमाबाई भीमराव आंबेडकर यांची १२७ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मौजे बेटमोगरा येथे दि.७ फेब्रु २०२५ रोजी सकाळी १० वा.त्यागमुर्ती रमाबाई भिमराव आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंती चा कार्यक्रम धम्मशील बुद्धविहार येथे पार पडला.या कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात प्रथमतः तथागत भगवान गौतम बुद्ध, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,व महामाता रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमांना धुप,दीप प्रज्वलित करून व पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमावेळी बेटमोगरा येथील मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर सामाजिक सेवाभावी संस्थेचे सचिव तथा पत्रकार भारत सोनकांबळे यांनी महामाता रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनातील विविध पैलूंवर व रमाबाईंच्या वैवाहिक जीवनाच्या प्रारंभीच्या काळात उपासमार, हालअपेष्टा, डोक्यावर शेण वाहून नेणे. दु:ख आणि दारिद्र्याचे जे प्रसंग ओढवले आपल्या ठायी असलेल्या जन्मजात मनोधैर्याने तोंड दिले. रमाबाईंनी आपल्या शालीनता आणि विनम्रतेला



थोडही ढळू दिली नाही. आयुष्यातील बहुतेक काळ रमाईने असहाय्य दारिद्र्यात काढले, त्यामुळे सर्व स्त्री वर्गाने रमाबाईंचा आदर्श आपल्या जिवनांत अंगीकारला पाहीजे असे यावेळी बोलताना आपले विचार प्रकट केले. तसेच दिलीप भद्रे यांनी प्रास्ताविकात बोलतांना त्यागमुर्ती रमाबाई भिमराव आंबेडकर यांच्या जिवन कार्यावर आपले विचार व्यक्त केले.या कार्यक्रमाला मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार हणमंत पाटील बेटमोगरेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दत्तात्रय पाटील मुदळे, बेटमोगरा ग्राम पंचायत चे सरपंच नयुम दफेदार, चिनू पाटील, राजू चीलकावार,मारोती मादाळे, हरिदास कांबळे, दिपक सोनकांबळे,बालाजी सोनकांबळे, रामजी सोनकांबळे (जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त विशेष शिक्षक),दिलीप सोनकांबळे, मारोती गायकवाड,शंकर सोनकांबळे, रत्नाकर सोनकांबळे, रोशन सोनकांबळे, कृष्णा सोनकांबळे, जयंती अध्यक्षा ललिताबाई सोनकांबळे,सचिव-संगीताबाई सोनकांबळे, उपाध्यक्ष शिल्पा सोनकांबळे इत्यदिंसह अंजनबाई सोनकांबळे, ज्योतीबाई सोनकांबळे,श्वेता भारत सोनकांबळे,रूक्माबाई सोनकांबळे,सागरबाई सोनकांबळे,रमाबाई सोनकांबळे सह असंख्य धम्म बांधव धम्म भगिनी उपस्थीत होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार भारत सोनकांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन रामजी सोनकांबळे सर यांनी केले.रूक्माबाई सोनकांबळे,सागरबाई सोनकांबळे,रमाबाई सोनकांबळे सह गावकऱ्यांची उपस्थिती होती.



# लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूलच्या चिमुकल्यांनी बनविले रॉकेट मॉडेल

कडा (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यामध्ये प्रथमच महावीर इंग्लिश स्कूल कडा यांच्या वतीने आणि इग्नाईटिंग ड्रीम्स ऑफ यंग माईंडस फाऊंडेशन यांच्या सहकार्याने जी भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्रो) अंतर्गत कार्य करत आहे. मुलांमध्ये कौशल्य क्षमता विकसित करणे,मुलांचा वैज्ञानिक दृष्टीकोन वाढविणे त्याचबरोबर मुलांमध्ये अवकाश विज्ञानाविषयी आवड निर्माण व्हावी याकरिता शनिवार दिनाक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी एकदिवसीय अंतरीक्ष ज्ञान अभियान या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी श्री.रविशंकर कुमार सर,श्री.रत्नेश सोनी सर आणि श्री.नवीन सर या इस्रो टीमच्या मार्गदर्शनाखाली अगरबत्ती बॉक्स, पोटॅशियम नायट्रेट, शुगर,चारकोल,पुठ्ठा,चिकट टेप सह इतर वस्तूपासून रॉकेट तयार करून त्यांचे अवकाशात यशस्वी सामूहिक प्रक्षेपण केले.या कार्यशाळेमध्ये एकूण १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता, यामध्ये एकूण २८ रॉकेट तयार करण्यात आले होते या सर्व रॉकेटने गगन भरारी घेतली.अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. अश्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना नव-नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. सर्वच विद्यार्थ्यांनी खुप मेहनत घेऊन हे रॉकेट बनविले व जेव्हा हे रॉकेट आकाशात उडत होते तेव्हा या विद्यार्थ्यांचा आनंद हि गगनाला भिडल्या सारखा दिसून येत होता. या आनंदाच्या क्षणांना उपस्थितांच्या टाळ्यांच्या कडकडाटाने विद्यार्थ्यांच्या आनंदाला द्विगुणित केले. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष श्री.अमितजी राठोड,उपाध्यक्ष श्री. संदिपजी चानोदिया, सचिव श्री. हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष श्री.डॉ. प्रमोदजी भळगट,श्री.मनिषजी गांधी,श्री. प्रकाशजी श्रीश्रीमाळ, श्री.अमोलजी पटवा, श्री. संजयजी पितळे, श्री संतोषजी गांधी सल्लागार श्री. पी.जी. मेहेर सर, मुख्याध्यापक के.अभिलाष सर उपस्थित होते. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने कडा आणि कडा परिसरातील पालकवर्ग आणि शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी सहकार्य करून यशस्वी रित्या हे कार्यक्रम पार पाडले.

# .....अन्यथा आमरण उपोषण करणार

**बीड – मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी चव्हाट्यावर आली आहे. दुसरीकडे महादेव मुंडे हत्या प्रकरणाला भाजप आमदार सुरेश धस यांनी वाचा फोडली. आता या प्रकरणी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी पोलिस प्रशासनाला इशारा दिला आहे. या प्रकरणाचा तपास एसआयटी, सीआयडी मार्फत करावा अन्यथा आम्ही कुटुंबीय बीड पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार, असे ज्ञानेश्वरी मुंडे यांनी म्हटले आहे.**

**महादेव मुंडे यांची १४ महिन्यांपूर्वी हत्या करण्यात आली होती. मात्र, परळी पोलिसांकडून या प्रकरणात कोणतीही कारवाई झाली नसल्याचा खुलासा भाजप आमदार सुरेश धस यांनी केला होता. त्यानंतर महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा तपास अंबाजोगाईचे पोलिस उपाधीक्षक अनिल चोरमले यांच्याकडे देण्यात आला. मात्र, आता अंबाजोगाईचे पोलिस उपाधीक्षकांकडूनही आम्हाला न्यायची अपेक्षा नाही, असे म्हणत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी या प्रकरणाचा तपास एसआयटी, सीआयडी मार्फत करण्याची मागणी केली आहे.**

नेमके काय म्हणाल्या ज्ञानेश्वरी मुंडे?

महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाचा तपास अंबाजोगाईचे पोलिस उपाधीक्षक अनिल चोरमले यांच्याकडे देण्यात आला होता आम्ही त्यांना भेटलो



होतो. मात्र आता त्यांच्याकडून आम्हाला न्यायची अपेक्षा नाही. आम्ही बीड पोलिस अधीक्षकांची भेट घेणार असून त्यानंतर त्यांना ३ दिवसाची मुदत देऊन पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आमची एवढीच मागणी आहे एसपी साहेबांना, या प्रकरणात तात्काळ एसआयपी आणि सीआयडी द्या. नाहीतर आम्ही पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करू. याआधीही आम्ही डझ साहेबांना भेटलो होतो. तेंव्हा तपास अंबाजोगाई पोलिस उपअधीक्षक अनिल चोरमले यांच्याकडे सोपवण्यात आला नव्हता. त्यांच्याकडे कोणत्याच गोष्टीचा फॉलोअप मिळाला नाही. त्यामुळे या प्रकरणात आम्हाला एसआयटी आणि सीआयडी तपास हवा आहे, अशी मागणी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडेंनी बीड पोलीस अधीक्षकांकडे केली.

# १० फेब्रुवारी : जागतिक कडधान्य दिन

दरवर्षी १० फेब्रुवारीला जागतिक कडधान्य दिन साजरा केला जातो . हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश लोकांना डाळींच महत्त्व पटवून देण आणि पोषण आणि अन्नसुरक्षेसाठी कडधान्ये किती महत्त्वाची आहेत , हे सांगण हा आहे . जागतिक कडधान्य दिन साजरा करण्यामागचा इतिहास आपण जाणून घेऊया . ' जागतिक कडधान्य दिन ' पहिल्यांदा २०१६ मध्ये साजरा करण्यात आला , नंतर संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने १० फेब्रुवारी हा जागतिक कडधान्य दिन म्हणून साजरा करण्याचा ठराव मंजूर केला . तेव्हापासून हा दिवस ' जागतिक कडधान्य दिन ' म्हणून साजरा केला जातो .

या वर्षीच्या जागतिक कडधान्य दिनाचा कडधान्य : कृषी अन्न प्रणालींमध्ये विविधता आणणे हा थीम असेल .आजच्या जीवनशैलीत लोक फास्ट फूड आणि फ्रोझन फूडला जास्त महत्त्व देत आहेत . त्यामुळे आपल्या आहारात डाळींचा वापर कमी होत आहे . त्यामुळे शरीराला पूर्ण पोषण मिळत नसून त्याचे दुष्परिणाम लोकांच्या विशेषत: लहान मुल व तरुणांच्या आरोग्यावर होत आहेत . लोकांच्या आरोग्यासाठी आणि अन्नसुरक्षेसाठी डाळी किती महत्त्वाच्या आहेत , ही बाब लोकांपर्यंत पोहोचावी आणि डाळींचा आहारात समावेश करण्यासाठी जनजागृती व्हावी , या उद्देशाने जागतिक कडधान्य दिन साजरा केला जातो .

द्विदल धान्यांना म्हणजेच ज्या धान्यांपासून डाळी तयार होतात , त्यांना कडधान्य म्हणतात . मूग , उडीद , तूर , हरभरा , मसूर , राजमा , वाटाणा , कुळिथ यांसारख्या अनेक प्रकारच्या कडधान्यांच उत्पादन भारतात घेतल जात . हे प्रथिनांचे मुख्य स्त्रोत आहेत .

देशाच्या ग्रामीण आणि शहरी भागात , १९९९-२००० या वर्षात कडधान्ये / डाळींचा मासिक दरडोई वापर अनुक्रमे ०.८१ आणि ०.९६ किलोग्रम इतका होता . त्यात २०११-१२ मध्ये घसरण होऊन तो अनुक्रमे ०.७४ आणि ०.८६ किलोग्रॅम इतका झाला . खर तर सद्यस्थितीत भारत हा कडधान्ये / डाळींचा जगातील सर्वात मोठा उत्पादक आणि ग्राहक देश आहे . परंतु देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी भारतातले उत्पादन अपुरे असल्याने त्याची आयात करणे भाग पडते आहे . अलीकडच्या काळात देशातली कडधान्ये / डाळींची मागणी सातत्याने वाढली आहे . या पार्श्वभूमीवर देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी सरकारने कडधान्ये / डाळींचे उत्पादन वाढावे यासाठी अनेक उपाययोजना हाती घेतल्या . त्यामुळे २०१४-१५ पासून आयातीचे प्रमाणही सातत्याने कमी होऊ लागले आहे . भारतात दरवर्षी सुमारे २५.४६ दशलक्ष टन इतके कडधान्य / डाळींचे उत्पादन होते .

डाळीच्या धान्याची बहुतेक सर्व पिके इतिहासपूर्व कालापासून लागवडीखाली आहेत . त्यांचे बी भरडल्यास त्याच्यावरील टरफल निघून जाऊन प्रत्येक दाण्याच्या दोन - दोन डाळिंब्या ( दळे ) होत असल्यामुळे त्यांना डाळीची धान्ये ( द्विदल धान्ये ) म्हणतात . कडधान्यात उडीद , कुळीथ ,घेवडा , चवळी , तूर , वाल , वाटाणा , मटकी , मूग , सोयाबीन , हरभरा इत्यादींचा समावेश होतो .

कडधान्ये बहुतेक सर्व प्रकारच्या जमिनीत येतात . परंतु चांगल्या प्रकारच्या जमिनीवरील पिकाचे उत्पन्न जास्त येते . हंगाम जातीपरत्वे खरीप , रब्बी किंवा उन्हाळी असतो . बियांच्या आकारमानाप्रमाणे हेक्टरमध्ये ४०-९० किग्रॅ बी दोन ओळींमध्ये सुमारे ४५ सेमी अंतर ठेवून मिश्रपीक किंवा स्वतंत्र पीक म्हणून पेरतात . साधारणत: पेरल्यापासून ९० ते १२० दिवसांत पीक तयार होते . शेंगा पक्व होऊन त्यांच्यामधील बी कडक झाल्यावर झाडे बुंध्याजवळ विळ्याने कापून खळ्यावर वाळवून मळणी करतात .

बियांचे आकार व रंग निरनिराळे असतात . बियांत २१-२५ टक्के प्रथिन , ५८-६४ टक्के कार्बोहायड्रेट , १.५ टक्के वसा (फॅट्स ) आणि कॅल्शियम , फॉस्फोरिक आम्ल व ब १ जीवनसत्त्वही पुष्कळ असते .

मनुष्याच्या रोजच्या पिष्टमय अन्नात चौरस आहाराच्या दृष्टीने जरूरीची असलेली शाकीय ( वनस्पतिजन्य ) प्रथिने डाळीतून भरपूर मिळतात . त्यामुळे



मानवाच्या आहारात डाळी फार महत्त्वाच्या समजतात . आहारात कडधान्याचे वाळलेले किंवा ओले दाणे आणि कोवळ्या शेंगांचाही उपयोग करतात . यांच्या मुळ्यावरील गाठींतील सूक्ष्मजंतू हवेतील मुक्त नत्र जमिनीत स्थिर करतात . त्यामुळे जमिनीची उत्पादनक्षमता वाढते म्हणून तृणधान्याच्या पिकात द्विदलाची मिश्रपिके घेतात . काही जाती हिरवळीच्या खतासाठी वापरतात . त्यांच्यापासून गुरांना वैरण मिळते .

डाळी हे प्रथिनांचे ( प्रोटीन ) प्रमुख स्त्रोत असून सर्व प्रकारच्या लोकांमध्ये डाळी हा भारतीय आहाराचा अविभाज्य भाग घटक आहे आणि कर्बोदकांमधे समृद्ध आहाराला आवश्यक प्रोटीन पुरवतो . डाळींचे उत्पादन जगात भारताचे सर्वात जास्त आहे . डाळीच्या वजनापैकी २० ते २५ टक्के प्रथिने आहे , जे गव्हाच्या प्रथिने पदार्थाच्या दुप्पट आहे आणि तांदूळापेक्षा तीनपट आहे .

कडधान्याची पोषकता : कडधान्य ही प्रथिनांनी समृद्ध असतात . १०० ग्रॅम कडधान्यामध्ये १७ ते २५ टक्क्यापर्यंत प्रथिने असतात . याला अपवाद म्हणजे सोयाबीन . यामध्ये प्रथिनांचे प्रमाण ४० ते ४२ टक्के असते . शाकाहारी लोकांच्या आहारामध्ये प्रथिनांची पूर्तता प्रामुख्याने कडधान्यातूनच होते .

भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (आय सी एम आर ) यांनी दिलेल्या संकेताप्रमाणे एका वर्षांत प्रती माणसी कमीत कमी १७ ते २५ किलो कडधान्य वापरणे आवश्यक आहे .

मोड न आलेल्या कडधान्यामध्ये तीन अपोषक द्रव्ये असतात . ती म्हणजे टॅनीन , फायटीक सीड आणि ट्रिप्सीन इनहीबीटर . टॅनीनमुळे लोहाच्या शोषणास अडथळा निर्माण होतो आणि फायटीक आम्लामुळे चुण्याचे शोषण कमी होते . ट्रिप्सीन इनहीबीटरमुळे ट्रिप्सीन नावाच्या विकरे (एन्झाइम) निर्मितीमध्ये अडथळा येतो . त्यामुळे कडधान्याचे पचन नीट होत नाही . म्हणून मूग , चवळी , उडीद , हरभरा , कडवा वाल व पावटा हे पचायला सर्वात कठीण असतात .

कडधान्य रात्रभर भिजत ठेवल्यास त्यातील टॅनीन आणि फायटीक सीड चे प्रमाण कमी होते . कडधान्य चांगली शिजवली तर ट्रिप्सीन इनहिबीटरचा नाश होतो . आपल्याकडे ( महाराष्ट्र ) कडधान्यांना भिजवून मोड आणून खाण्याची एक जुनी परंपरा आहे . त्यामुळे काही विशिष्ट विकरे (एन्झाइम) उत्तेजित होतात .

मोड आलेल्या कडधान्याचे फायदे : मोड येण्यापूर्वी कडधान्यामध्ये ' क ' जीवनसत्त्व हे प्रति १०० ग्रॅम २ ते ६ मिलीग्रॅम असते . हेच प्रमाण मोड काढल्यानंतर २७ ते ५२ मिलीग्रॅम पर्यंत वाढते . मोड आणल्यामुळे कडधान्यांचा वातुळपणा कमी होतो .मोड येण्याच्या प्रक्रियेत टरफलांमध्ये असलेले टॅनीन आणि फायटीक सीड यांचे निरुपद्रवी द्रव्यात रुपांतर होते . त्यामुळे लोहाचे आणि चुन्याचे शोषण वाढते . याचा शरीराला चांगला फायदा होतो . मोड आणण्याच्या प्रक्रियेमध्ये कडधान्य हलके होतात आणि पचायला सुलभ होतात . मोड आलेली कडधान्ये सुकवून ठेवता येतात . अशा सुकविलेल्या मोडामध्ये कार्बोदकाचे आणि ' क ' जीवनसत्वे मोठ्या प्रमाणावर वाढते . मोड आणण्याच्या प्रक्रियेमध्ये प्रथिने आणि कर्बोदकाची पाचकता लक्षणीय प्रमाणात वाढते . अशा मोड असलेल्या कडधान्यांचा दैनंदिन आहारातील समावेश म्हणजेच आरोग्याची गुरुकिल्ली . मोड आलेली कडधान्य मानवाच्या शरीराला अतिशय महत्त्वाची व गुणकारी असतात .शरीराची झीज भरून काढण्यासाठी आणि पाचकता वाढविण्यासाठी मोड आलेली कडधान्य आवश्यक असतात .केंद्र व राज्य सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे भारत कडधान्यांबाबत / डाळींबाबत 'आत्मनिर्भरते'च्या अगदी समीप पोहचला आहे . अशावेळी शाश्वतता आणि योग्य आहाराची गरज या दोन्ही बाबींच्या दृष्टीन सूक्ष्मपोषणमुल्यांचा भूरभूर समावेश असलेल्या कडधान्य / डाळींच सेवन महत्वाच आणि लाभदायक आहे , याबाबत नागरीकांमध्ये जागरूकता वाढवणं अधिक महत्वाचं ठरणार आहे .

**-चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके ,**
तहसीलदार , बीड

# मनुस्मृतीमुळे जनता गुलामीत गेली विज्ञानापेक्षा धर्म वरचढ झाल्यास देश रसातळाला जाईल - आनंदराज आंबेडकर

प्रतिनिधी । माजलगांव

मनुस्मृतीमुळे भारत देशातील जनता बौद्धिक गुलामीत गेली होती आणि आत्ता विज्ञानापेक्षा जर धर्म वरचढ झाल्यास भारत देश रसातळाला जाईल अशी सणसणीत प्रतिक्रिया रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी व्यक्त केली ते निर्भीड पत्रकार संघ शाखा माजलगाव आयोजित मूकनायक पुरस्कार व माजलगाव भूषण सोहळ्या प्रसंगी बोलत होते '

निर्भिड पत्रकार संघ माजलगावच्या वतिन मूकनायक दिनाचे औचित्य साधून दिनांक ०६ फेब्रुवारी रोजी शहरातील वैष्णवी मंगल कार्यालय येथे मूकनायक पुरस्कार व माजलगाव भूषण पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजना केले होते

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजलगाव मतदार संघाचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके, उद्धघाटक रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर, प्रमुख पाहुणे म्हणून प्रखर वक्ते दीपक भाई केदार, निर्भीड पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष देवेंद्रजी ढाका, अमर साळवे , परमेश्वर सोळंके , आनंद विर , समीर काझी, किरण डोळस , मोनिका बेद्रे , आम्रपाली साबळे मूकनायक पुरस्कार प्राप्त दैनिक महाभारत चे मुख्य संपादक विजयकुमार वाव्हळ, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय दादा साळवे, मा. सभापती संभाजी शेजुळ , दै. वास्तवचे उपसंपादक अरविंद ओव्हाळ , सा. गदरचे संपादक ज्ञानेश्वर लंगे आदींची उपस्थिती होती.

प्रसंगी आनंदराज आंबेडकर म्हणाले की आपण भारतीयांनी मनुस्मृतीच्या नावाखाली खूप अन्याय अत्याचार सोसले, बौद्धिक गुलामी सोसली मात्र केंद्रातील लोक देशाला हिंदूराष्ट्र बनवण्याचे स्वप्न पाहत आहेत , विज्ञानापेक्षा धर्म वरचढ झाला तर भारत देश सर्वच गोष्टीत रसातळाला जाईल त्यामुळे केंद्रातील सरकारच्या विरोधात आपणच लोकांचा आवाज होऊन बोलत व्हायला हवे कारण आपणही मूक नायक आहोत हे दाखवून देण्याची गरज आहे तरच खरा मूकनायक दिन साजरा झाल्याचे चिज होईल . आमदार प्रकाश सोळंके यांनी आपल्या अध्यक्षिय भाषणात बोलताना म्हणाले की गेल्या दोन महिन्या पासुन मिडियाच्या माध्यमातुन बीड जिल्ह्यातील बातम्या जोर धरत असतांना दुसऱ्या बाजुने निर्भिड पत्रकार संघाच्या वतीने कौतुकास्पद मूकनायक पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जाते याचा मला आनंद आहे. एकीकडे जिल्हा बदनाम होत असताना माजलगाव तालुका हा या सर्व बाजूना अपवाद आहे.

स्वर्गवासी संतोष देशमुख हत्ये नंतर त्यांच्या कुटुंबीयांना मदतीचा हात म्हणून पत्रकार संघ व सर्व जाती धर्माच्या वतीने पंच्यावन्न लाख रुपयांची मदत करत माणुसकी जपण्याचे काम माजलगाव मतदार संघाने केले आहे.निर्भिड पत्रकार संघाच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना मुकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार देवून गौरविण्यात आले. निश्चितपणे हा पुरस्कार मिळाल्या नंतर पुरस्कारार्थी मान्यवर अधिक जोमाने सक्षमपणे भरिव योगदान समाजासाठी देतील हा विश्वास व्यक्त केला.

बीड जिल्ह्यातील पत्रकारिता महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाची - दीपक केदार

बीड जिल्ह्यातील पत्रकार आणि बीड जिल्ह्याची पत्रकारिता महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाची पत्रकारिता आहे, आणि आदर्शवत पत्रकारिता आहे आम्ही बाहेर असूनही बीडचे पेपर प्रमुख्याने वाचतो इथे कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता पत्रकारिता केली जात असल्यामुळे मसाजोग येतील संतोष देशमुख यांच्या खुनाचे प्रकरण उघडे पडले आणि सरकार विरुद्ध जनता अशा लढाईत सरकार तोंडाशी पडले त्यामुळेच खऱ्या पत्रकारितेला मीडिया ट्रायल नाव दिले हे नवे फॅड आता हाणून पाडण्याची गरज आहे सरकार किंवा सरकारमधील व्यक्तीवर सत्य आरोप झाला तरीही मीडिया ट्रायल म्हणून घटनेला वेगळी बाजू देण्याचा प्रताप चालू आहेत त्यामुळे बीड जिल्ह्यातील बहाद्दर पत्रकारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून



असाच गोर गरीब दिन दलित दुबळ्याच्या अन्याय अत्याचारवर लिखाण करत सर्वसामान्यांच्या पाठीशी उभा राहण्याची भूमिका ठेवावी दीपक केदार हमेशा पत्रकाराच्या पाठीशी उभा राहील असे आश्वासन दिले .

पुरस्काराला उत्तर देताना विजय साळवे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपलं वृत्तपत्र चालवताना जे लोक तोंड असूनही बोलू शकत नाही गप गुमान अत्याचार सहन करतात आशा लोकांचा आवाज म्हणून मूकनायक वर्तमानपत्र चालवले गेले मात्र सध्या पत्रकारिता क्षेत्रात धंदेवाईक लोकांचा शिरकाव झाल्यामुळे काय छापावे आणि काय नाही छापावे हे मीडियातील प्रमुख लोक ठरवू लागल्याने अनेक गोष्टीत न्याय मिळत नाही त्यामुळे निर्भीड पत्रकार संघाच्या पत्रकारांनी निर्भीडपणे दिनदलित गोरगरीब जनतेवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडावी अन् आपल्यातील मूकनायक सिद्ध करावा .

यावेळी निर्भीड पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके, अमर साळवे, शेख हमिद , राजरतन डोंगरे, सिद्धेश्वर गायकवाड, संतोष रासवे, विजय डावरे , विजय कापसे , प्रचंड सोळंके , मुंजा गाडेकर , आनिकेत भिलेगावकर , तेजस शिंदे , गणेश तौर , दत्ता जाधव , रामभाऊ यादव , रंजित अडागळे आदिनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले माजलगाव शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातून महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यांचा झाला सन्मान -

संपादक विजयकुमार वाव्हळ , संपादक ज्ञानेश्वर लंगे , उपसंपादक अरविंद ओव्हाळ , रिपाई जिल्हाध्यक्ष विजयदादा साळवे , मा.सभापती संभाजी शेजुळ , डॉ. कोडगिरकर , शिवाज्ञा कोचिंग क्लासेस चे अध्यक्ष जिवन नखाते सर , चेअरमन सागर खुर्पे , मुख्याध्यापक किशोर मोताळे सर , नवनाथ गिलबिले सर , सरपंच भागवत शेजुळ , ग्रामसेवक आनंदकुमार सिरसट , ड. अजित जगताप , तलाठी प्रमोद चव्हाण , उद्योजक पद्माकर कांबळे , नगर सेवक शरद यादव , पाटिल प्रतिष्ठान चे अध्यक्ष श्रीराम नरवडे , महसुल सेविका सौ. कौशल्याताई लोखंडे , जकिबाबा फाऊंडेशनचे शेख शौकत , संध्या अकाश जाधव.